शुक्रवार
२३.०१.२०२६
किंमत २ रूपये
वर्ष २९ वे अंक ३४२ पाने ६
R.N.I.No.MAHMAR./2001/10338
www.pritisangam.com
पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026

# प्रीतिसंगम

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

**जम्मूत सैन्याची गाडी ४०० फूट खोल दरीत कोसळली**
**१० जवानांचा मृत्यू, २१ जण प्रवास करत होते**
**११ जखमींना एअरलिफ्ट केले**

# दोन खूनांच्या घटनेने जिल्हा हादरला

## साताऱ्यात युवकावर कोयत्याने हल्ला



**सातारा/प्रतिनिधीः-**
करंजे, ता.सातारा येथील आंदेकर चौक परिसरात गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास पूर्ववैमनस्यातून झालेल्या हल्ल्यात वृषभ जाधव (वय ३०, रा. रविवार पेठ,सातारा) या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हल्लेखोरांनी कोयत्याने मारहाण केल्याने परिसरात खळबळ उडाली या युवकाचा उपचारादरम्यान खाजगी रुग्णालयात मृत्यू झाल्याने शाहूपुरी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा या यंत्रणा तात्काळ सतर्क झाल्या .पोलीस युद्ध पातळीवर संबंधित संशयितांचा शोध घेत असून जुन्या भांडणातून हा कोयता हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे .जाधव याच्या कुटुंबीयांची जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, आंदेकर चौकात वृषभ जाधव याच्यावर तीन ते चार जणांकडून अचानक कोयत्याने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला,डोक्याला गंभीर जखम झाली .मारहाण करणाऱ्यांनी जाधव याला करंजे परिसरातून पुन्हा मंगळवार पेठ नेले व तेथेही बेदम मारहाण केली .या मारहाणी मध्ये जाधव अत्यंत गंभीर जखमी झाला . अंतर्गत रक्तस्त्राव होत असल्याने जखमी अवस्थेत त्याला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.आहे.घटनास्थळी चप्पल,घड्याळ आणि रक्ताचा सडा पडला होता.हल्ला सुरू असताना नागरिक भयभीत झाले होते. हल्ल्यानंतर नागरिकांनी गर्दी केली, घटनेची माहिती समजतात शाहूपुरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

शाहूपुरी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्हीच्या आधारे मारेकऱ्यांचा शोध सुरू केला आहे.घटनेनंतर जाधव यांचे नातेवाईक व मित्रांनी रुग्णालय परिसरात मोठी गर्दी केली.यावेळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी रुग्णालय परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला होता. डॉक्टरांनी मृत्यूची अधिकृत माहिती दिल्यानंतर मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.दरम्यान, घटनेनंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले असून शाहूपुरी पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.अगोदरच्या भांडणाचा राग मनात धरून हा हल्ला केला असल्याची चर्चा दिवसभर सातारा शहरात पसरली होती. अक्षय जाधव हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा होता .साताऱ्यात राजवाडा परिसरात झालेल्या गोळीबार प्रकरणात येईल त्याचा सहभाग असल्याची पोलिसांची माहिती आहे .या प्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे .रात्री उशिरापर्यंत शाहूपुरी पोलिसांची पथके संशयितांचा शोध घेत होती.

## फलटणमध्ये पहिल्या प्रियकर व नवऱ्याच्या मदतीने दुसऱ्या प्रियकराचा निर्घृण खून

### लाकूड कापण्याच्या मशीनने तुकडे करून मृतदेहाची विल्हेवाट

**फलटण/प्रतिनिधीः-**
प्रेमसंबंधांच्या त्रिकोणातून फलटण तालुक्यात एक थरकाप उडवणारी आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. एका महिलेच्या पहिल्या प्रियकराने तिच्या नवऱ्याच्या मदतीने दुसऱ्या प्रियकराचा अत्यंत अमानुषपणे खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या खुनानंतर मृतदेह लाकडे कापण्याच्या मशीनने तुकडे करून काही अवयव नदीत फेकून, उर्वरित मृतदेह शेतात पुरण्यात आल्याचे



मयत सतीश दडस

पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात सागर दादासो दडस यांनी बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी आपला भाऊ सतीश ऊर्फ आप्पा दादासो दडस हरविल्याची तक्रार दाखल केली होती. विडणी परिसरात शोध घेऊनही सतीशचा थांगपत्ता लागला नाही. दरम्यान, सागर यांना त्यांच्या मालकाकडून धक्कादायक माहिती मिळाली. लखन बुधवाले याचा फोन आला असून, सतीश ऊर्फ आप्पा दडस याला लखन बंडू बुधवाले व सतीश तुकाराम माने यांनी काठीने मारहाण करून दूर सोडून दिले आहे, असे सांगण्यात आल्याचे समोर आले.

पान ५ वर



निरा नदीतून मृतदेह बाहेर काढतांना पोलीस अधिकारी

## साताऱ्यात उपनगराध्यक्ष निवडीला नाट्यमय वळण

### मनोज शेंडे यांच्या ऐवजी अ‍ॅड.दत्ता बनकर यांना संधी

**सातारा/प्रतिनिधीः-**
सातारा पालिकेच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीत खासदार उदयनराजे भोसले यांचे धक्का तंत्र नगरसेवकांनी अनुभवले .गेल्या २४ तासापासून या पदासाठी मनोज शेंडे यांचे नाव चर्चेत असताना फॉर्म भरण्याच्या वेळी एडवोकेट दत्ता बनकर यांना उदयनराजे यांनी अचानक संधी दिली .त्यामुळे पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी बनकर यांची एकमताने निवड करण्यातआली आहे.

पालिकेच्या सर्वसाधारण सभेत निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येऊन दुपारी साडेबारा वाजता पिठासन अधिकारी नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी या नावाची घोषणा केली .सातारा पालिकेच्या छत्रपती शिवाजी सभागृहात नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा पार पडली .सभेच्या सुरुवातीला सर्व नगरसेवकांचे आदी संहिता नियम पुस्तक व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले .वंदे मातरम आणि संहिता उद्देशिका वाचल्यानंतर निवड प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली .मुख्याधिकारी यांनी बारा वाजता छाननी करून प्राप्त झालेला एडवोकेट दत्ता बनकर यांचा एकमेव अर्ज



नगराध्यक्ष अमोल मोहिते यांना सादर केला .नगराध्यक्षांनी अर्ज माघारीची मुदत १५ मिनिटे देऊन त्यानंतर साडेबारा वाजता एडवोकेट दत्ता बनकर यांच्या नावाची घोषणा केली .यात सभेपूर्वी खासदार उदयनराजे भोसले स्वतः एडवोकेट दत्ता बनकर यांना घेऊन मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्या केबिनमध्ये दाखल झाले भारतीय जनता पार्टीचे पक्षप्रतोद निशांत पाटील यांनी हा अर्ज मुख्याधिकाऱ्यांकडे सादर केला.

सर्वसाधारण सभेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये दुपारी एक वाजता प्रांत आशिष बारकुल यांच्याकडून सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष अमोल मोहिते यांना छाननी करून प्राप्त झालेले पाच स्वीकृत सदस्यांचे अर्ज सादर झाले .यामध्ये खासदार गटाचे शंकर माळवदे पंकज चव्हाणआमदार गटाचे रवींद्र पवार सुनील भंडारीव रीना भणगेयांच्या नावाची घोषणा करण्यात आली .या सर्व निवडींचे सर्व नगरसेवकांनी बाकी वाजवून स्वागत केले .नगराध्यक्ष अमोल मोहिते व उपनगराध्यक्ष एडवोकेट दत्ता बनकर यांनी स्वीकृत सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले .नगराध्यक्ष अमोल मोहिते यांच्या वतीने सर्व सदस्यांना नगरपालिका अधिनियम १९६५ च्या नियमावली पुस्तिकेचे वितरण करण्यात आले.


### उदयनराजे भोसले यांच्या धक्का तंत्राची चर्चा

भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वजण एक आहोत कोणीही जवळचा आणि लांबचा असे काही नाही .काही प्रकरणाला चर्चा करून उगाच वाद वाढवूनका .शासकीय कामकाज आणि नेतृत्व कौशल्य या गोष्टी ध्यानात ठेवून तसेचपालिका कामकाजाच्या अनुभवानुसार अभ्यासू चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे .यामध्ये कोणालाही दुखावण्याचा कोणताही हेतू नाही मनोज शेंडेसुद्धा आमचेच आहे माझे व त्यांचे बोलणे झाले आहे . मात्र ड बनकर यांनी नूतन नगरपालिकेच्या इमारतीसाठी केलेला पाठपुरावा यामुळे सातारकरांना नाममात्र शुल्कात प्रशस्त इमारत मिळाली तसेच त्यांच्या ज्येष्ठत्वाचा सन्मानं करून त्यांना या पदाची संधी देण्यात आली आहेअसे खासदार उदयनराजे भोसले यांनी स्पष्टपणे आपल्या प्रतिक्रियेत सांगितले .तरीसुद्धा उदयनराजे भोसले यांच्या अचानक यू-टर्नची जोरदार चर्चा होती .मनोज शेंडे हे पहिल्या सर्वसाधारण सभेला अनुपस्थित राहिले याची सुद्धा खासदार गटांमध्ये चांगली चर्चा झाली .एडवोकेट दत्ता बनकर यांनी यासंदर्भात त्यांची भेट घेऊन नक्कीच त्यांची समजूत घालू असे आश्वासन दिले .

## डंपरने दुचाकी चालकास चिरडल्याने चालक जागीच ठार

**विटा/शिराज शिकलगारः-**
विटा शहरातील विटा - मायणी रोडवरुन सकाळी ११.१५ च्या सुमारास रिकामा डंपर छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जात असताना पाटील पेट्रोल पंपापासून काही अंतरावर नागनाथ नगर, नागेवाडी येथील पोस्टमन महादेव आनंदा शिंदे (वय - ५३, रा. नागनाथ नगर, नागेवडी ) हे त्यांच्या दुचाकीवरून विटा शहरातील काम उरकून पोस्टाकडे जात असताना डंपर व दुचाकी मोटरसायकलचा भीषण अपघात होऊन अपघातात महादेव शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातानंतर घटनास्थळी आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेतली. सदर अपघाताची माहिती पोलिसांना मिळताच विटा पोलीस व वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच डंपर चालकाने या अपघातानंतर घटनास्थळावरून डंपर (वाहन क्र. एमएच ११, बीएल ५७९० ) सुरूच ठेऊन पोलीस ठाणे गाठले, अशी माहिती घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी दिली. नागरिकांनी अपघातानंतर १०८ सह अन्य रुग्णवाहिकांना



फोन केले पण कोणतीही रुग्णवाहिका सेवा वेळेत मिळाली नाही. त्यामुळे विटेकर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. तर दुसरीकडे घटनास्थळी नागरिकांतून या अपघातानंतर याच डंपरच्या बाबतीत वेगवेगळ्या चर्चा व्यक्त होत होत्या.

काही महिन्यापूर्वी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात याच डंपरने एका महिलेस चिरडले होते. तसाच व त्या सारखाच एका मोटरसायकल चालकाला डंपरने चिरडले की काय ? अशी चर्चा होत होती. या अपघातानंतर विटा पोलिसांनी डंपर चालक व डंपर ताब्यात घेतला.

पान ४ वर

### विटा-मायणी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे होत आहे अपघात

विटा - मायणी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मागील काही दिवसापूर्वी छोटे-मोठे अपघात झाले होते. रस्त्यावरील खड्डे मोजणार की आणखीन कोणाचातरी बळी जाणार...संबंधित अधिकारी या रस्त्याकडे बघतील का, रस्त्याकडेचे पांढरे पट्टे दिसेनात, त्यामुळे दुचाकी आणि चार चाकी वाहनांना मार्गदर्शन होत नाही. दोन्ही बाजूला काही विक्रेते विक्रीसाठी रस्त्यावर बसल्याचे दिसून येते. अपघातानंतर रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. या अपघातानंतर बराच वेळ वाहतूक ठप्प झाली होती. वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी वाहतुकीचा मार्ग मोकळा करून दिला.

## सातारा तालुक्यात १३ अर्ज अवैध

**सातारा/प्रतिनिधी:-**
सातारा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत गटांचे तीन आणि गणांचे १० नामनिर्देशन पत्रे अवैध ठरली आहेत, अशी माहिती देण्यात आली.


सातारा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या खेड गटातील एक आणि नागठाणेमधील दोन अर्ज अवैध ठरले आहेत. तर एकूण आठ गटांसाठी ६९ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. तसेच पंचायत समितीच्या १६ गणांमध्ये १० नामनिर्देशन पत्रे अवैध ठरली. यामध्ये लिंब गणातून एक, कोडोली दोन, संभाजीनगर एक, निनाम दोन, तसेच अपशिंगे आणि नागठाणे गणातीलही प्रत्येकी दोन नामनिर्देशन पत्रे अवैध ठरली. एकूण १६ गणांमध्ये १०८ उमेदवार निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत.

## स्व.राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेला टाचण्या टोचल्या,लिंबू फिरला!

### निवडणुकांच्या धामधुमीत जादूटोण्याचा वापर:पुरोगामी विचारांना लागला डाग

**ईश्वरपूर/प्रतिनिधीः-**
वाळवा तालुक्यातील येलूर येथे स्व.राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेला टाचण्या टोचल्याचे, लिंबू फिरवल्याचे आढळून आले आहे. यामुळे पुरोगामी ओळख असणाऱ्या जिल्ह्याला डाग लागला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

नुकत्याच महानगरपालिका निवडणुका पार पडल्या असून जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरु



आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने सत्ताधारी आणि विरोध दोन्ही बाजूने जोरदार प्रचार सुरू आहे. प्रचारादरम्यान आरोप प्रत्यारोप, टीका टिप्पणी होत असते मात्र पुरोगामी विचारांचा वारसा जपणाऱ्या आणि पुरोगामी चळवळीला ताकद देणाऱ्या वाळवा तालुक्यात एक विपरीत प्रकार घडला आहे. वाळवा तालुक्यातील येलूर येथे स्व.राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेवर करणी केली आहे. नुकतेच भाजप आ.गोपीचंद पडळकर यांनी माजी मंत्री जयंतराव पाटील यांच्यावर टीका करताना स्व.राजारामबापू पाटील यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे मोठा वाद उत्पन्न झाला होता. आता या नव्या प्रकारामुळे नवा वाद निर्माण होण्याचे चिन्ह दिसत आहे.

### बाळासाहेब उर्जा..

बाळासाहेब ठाकरे
नावात अद्भुत उर्जा
त्यांचे अनुयाई होणे
नाही फुकट गमजा
सामावून घे सकला
खुल्यादिलाचा राजा
आडव्यावाटेला गेला
ढिला करे तया पुर्जा
जाणे अंतर्बाह्य तया
देतो दैवत्वाचा दर्जा
कल्याण कित्येकांचे
मनात भावली पुजा
विरळा निर्भीड वक्ता
ना शतसहस्त्रेशू दुजा
ऐका रेकॉर्डेड भाषणे
दे उर्जा आवाजखर्जा
आता त्यांच्यानावाचा
चालवला गाजावाजा
नावाचे ते राजकारण
वलयावर करे कब्जा
स्मरूनि बाळासाहेबां
सन्मान भगव्याध्वजा
कटुता सारी संपवावी
विवादास द्यावी रजा
भारतरत्न देता आता
वाढेल पुरस्कार दर्जा
बाळासाहेब सर्वांचेचं
पहावे कर्तृत्वअवरजा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## सांगली महापौरपद खुले झाल्याने भाजपची डोकेदुखी वाढली

### धीरज सुर्यवंशी,संतोष पाटील व अतूल माने यांच्या नावाची चर्चा

**सांगली/प्रतिनिधीः-**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली. आज मुंबईत नगर विकास विभागात सांगलीसह महाराष्ट्रातील इतर महापालिका महापौरपदाची आरक्षण सोडत पार पडली. यामध्ये सांगली, मिरज आणि कुपवाड या महापालिकेचे महापौरपद हे खुले झाले आहे. त्यामुळे काठावर बहुमत असलेल्या भाजपची डोकेदुखी वाढली आहे. या पदासाठी माजी उपमहापौर धीरज सूर्यवंशी, संतोष पाटील व अतुल माने यांची नावे आघाडीवर आहेत. २०२० चा अनुभव लक्षात घेता भाजपला महापौर निवडीसाठी मोठी रणनीती आखावी



लागणार आहे.

सांगली महापालिका निवडणुकीत ७८ पैकी ३९ जागा मिळवून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यांना बहुमतासाठी एक जागा कमी पडत आहे. १८ जागा जिंकून काँग्रेस दुसऱ्या तर १६ जागा मिळवून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष तिसऱ्या स्थानावर आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला ३ जागा मिळाल्या आहेत. तर दोन जागांवर विजय मिळवत महापालिकेत शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाने प्रवेश केला आहे. महापालिका निवडणुकीत कोणत्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. भाजपने काठावरचे बहुमत मिळवले असले तरी पूर्ण बहुमतासाठी त्यांना संख्या बळाची जुळवाजुळव करावी लागणार आहे. यासाठी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार व शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या पक्षाशी भाजपचे वरिष्ठ नेते चर्चा करणार आहेत. राज्यातील राजकीय स्थिती पाहता सांगलीत महापालिकेत भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना यांची महायुती सत्तेवर येणार असल्याचे स्पष्ट आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका, परिषदांच्या निवडणूकीपूर्वी तेथील जिल्हा परिषद अध्यक्ष व नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर होते. मात्र महापालिकांतील महापौर पदाचे आरक्षण निवडणूकीपूर्वी जाहीर झालेले नाही. यामुळे महापौर पदाबाबत प्रचंड उत्सुकता होती. सांगलीसह राज्यातील २९ महापालिकांच्या महापौर पदाची आरक्षण सोडत गुरुवार दि. २२ रोज सकाळी ११ वाजता मुंबईत नगरविकास विभागात चिठ्ठीव्दारे निघाली.



# संपादकीय

## ठाकरे बंधूंचा विसंवाद


महाराष्ट्राच्या राजकारणात मराठी माणूस हा मुद्दा नेहमीच भावनिक, संवेदनशील आणि प्रभावी ठरलेला आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उदयापर्यंत मराठी अस्मितेच्या राजकारणाने राज्याच्या सत्ताकारणाला दिशा दिली. मात्र, अलीकडील महापालिका निवडणुकांनंतर घडलेल्या घटनांनी या अस्मितेच्या राजकारणावरच गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. विशेषतः कल्याण-डोंबिवली महापालिकेतील सत्तास्थापनेदरम्यान मनसेने शिवसेना (शिंदे गट) सोबत केलेली युती आणि त्यामुळे उद्धव ठाकरे गटाला बसलेला धक्का, यामुळे मराठी माणूस पुन्हा एकदा राजकीय खेळाचा बळी ठरतो आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. महापालिका निवडणुकांपूर्वी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकत्र येत युतीची घोषणा केली, तेव्हा राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. ठाकरे बंधूंचे एकत्र येणे हे केवळ कौटुंबिक नव्हे, तर राजकीयदृष्ट्याही ऐतिहासिक मानले गेले. एकत्र आलो आहोत ते कायम एकत्र राहण्यासाठी, मराठी माणसाच्या हितासाठी भाजपविरोधात लढा अशा गगनभेदी घोषणा करण्यात आल्या. प्रचारात भाजप आणि शिंदेसेनेवर टोकाची टीका झाली. मराठी मतदारांमध्येही एक आशा निर्माण झाली की, दीर्घकाळानंतर मराठी अस्मितेच्या नावाखाली एकसंध राजकीय ताकद उभी राहत आहे.

मात्र, निवडणुकीचे निकाल जाहीर होताच चित्र झपाट्याने बदलू लागले. मुंबईसह अनेक महापालिकांमध्ये ठाकरे बंधूंच्या युतीला अपेक्षित यश मिळाले नाही. भाजप-शिंदेसेना युतीने राज्यातील बहुतांश महापालिकांवर वर्चस्व सिद्ध केले. अशा परिस्थितीत सत्ता स्थापनेच्या गणितात वेगवेगळ्या राजकीय हालचाली सुरू झाल्या. याच पार्श्वभूमीवर कल्याण - डोंबिवली महापालिकेत मनसेने थेट शिंदेसेनेला पाठिंबा दिला आणि उद्धवसेनेला बाजूला ठेवले. या घटनेने ठाकरे बंधूंच्या युतीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. निवडणुकीपूर्वी भाजप - शिंदेसेनेविरोधात एकत्र लढण्याच्या शपथा घेतल्या जात असताना, निवडणुकीनंतर मात्र सत्ता समीकरणासाठी वेगळी भूमिका घेतली गेली, हे मराठी मतदारांच्या पचनी पडणारे नाही. कल्याण - डोंबिवलीतील घडामोडी केवळ स्थानिक राजकारणापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत. उद्धवसेनेचे दोन नगरसेवक मनसेत दाखल झाले, तर मनसेने शिंदेसेनेच्या महापौर उमेदवाराला जाहीर पाठिंबा दिला. यामुळे उद्धव ठाकरे गटात तीव्र नाराजी पसरली. खासदार संजय राऊत यांनी उघडपणे मनसेवर टीका करत, शिंदेंसोबत जायचेच होते, तर आमच्याशी युती कशाला केली? असा सवाल केला. राऊत यांनी हेही स्पष्ट केले की, शिंदे गटासोबत कोणत्याही प्रकारची युती ही उद्धवसेनेच्या धोरणाविरोधात आहे. आमच्यासाठी शिंदे म्हणजे एमआयएम असे कठोर शब्द वापरत त्यांनी भूमिका स्पष्ट केली. मात्र, दुसरीकडे मनसेने, स्थानिक नेतृत्वाला निर्णयाचे स्वातंत्र्य असल्याचे सांगत आपली बाजू मांडली. सत्ता बाहेर राहून काम करणे अशक्य असल्याने, सत्तेत राहून अंकुश ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे मनसे नेत्यांनी स्पष्ट केले.

या साऱ्या घडामोडींमधून एक महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो, निवडणुकीपूर्वी रणनीती ठरवणारे ठाकरे बंधू, निकालानंतरच्या परिस्थितीबाबत एकत्र चर्चा का करू शकले नाहीत ? सत्ता स्थापनेवेळी काय भूमिका घ्यायची, स्थानिक पातळीवर युतीचे बंधन किती असणार, याबाबत स्पष्टता नसल्यानेच असा विसंवाद निर्माण झाला का ? राजकीय विश्लेषकांच्या मते, हा समन्वयाचा अभावच ठाकरे बंधूंच्या युतीची सर्वात मोठी कमकुवत बाजू ठरली. या साऱ्या घटनांनंतर मनसे आणि उद्धवसेना मराठी माणसाला मूर्ख बनवत आहेत का ? असा मतप्रवाह समाजमाध्यमांवर आणि राजकीय वर्तुळात जोर धरू लागला आहे. मराठी अस्मितेच्या नावाखाली मते मागायची आणि सत्तेच्या गणितासाठी वेगळी भूमिका घ्यायची, हे मतदारांना मान्य होईल का, हा प्रश्न आहे. केशव उपाध्ये यांनी केलेली टीका, पत्त्यातील बंगला यापेक्षा जास्त टिकतो. ही टीका केवळ टोमणा नसून, ठाकरे बंधूंच्या राजकारणातील अस्थिरतेचे प्रतीक ठरत आहे. महापालिका निवडणुकांनंतर आणखी एक मुद्दा ऐरणीवर आला, तो म्हणजे पराभूत उमेदवार आणि कार्यकर्त्यांची उपेक्षा. उद्धवसेना, मनसे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून पराभूत उमेदवारांची साधी विचारपूसही झाली नाही, अशी चर्चा आहे. याउलट भाजप आणि शिंदेसेनेने पराभूत उमेदवारांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. राजकारणात विजय जितका महत्त्वाचा, तितकाच पराभव स्वीकारण्याची आणि कार्यकर्त्यांना सांभाळण्याची जबाबदारी पक्ष नेतृत्वाची असते. ती जबाबदारी ठाकरे बंधू आणि काँग्रेस आघाडी पार पाडण्यात अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे.

कल्याण - डोंबिवलीतील घटना ही केवळ एका महापालिकेपुरती मर्यादित नाही. ती ठाकरे बंधूंच्या युतीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. जर मराठी अस्मितेच्या नावावर एकत्र येऊनही स्पष्ट धोरण, विश्वासार्हता आणि शिस्त नसेल, तर मराठी मतदारांचा विश्वास पुन्हा मिळवणे अवघड ठरेल. आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंना आत्मपरीक्षण करणे अपरिहार्य आहे. मराठी अस्मिता ही केवळ निवडणूक जिंकण्यासाठी वापरण्याची घोषणा नाही, तर ती सातत्यपूर्ण, प्रामाणिक आणि एकसंध राजकीय भूमिकेची मागणी करते. कल्याण - डोंबिवलीतील सत्तास्थापनेने हे स्पष्ट केले आहे की, घोषणांपेक्षा कृती महत्त्वाची असते. ठाकरे बंधूंच्या युतीतून मराठी माणसाला अपेक्षा होत्या, पण त्या अपेक्षांवर सध्या तरी पाणी फेरले गेले आहे. आता प्रश्न एवढाच आहे, हा धडा घेऊन ठाकरे बंधू आपले राजकारण सावरणार की मराठी मतदारांचा भ्रमनिरास अधिक गडद होणार ?

# हिंदूंचा हृदयसम्राट






अशोक सुतार

कृष्णाकाठ...

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची आज जन्मशताब्दी सर्वत्र साजरी होत आहे. बाळासाहेब आज हयात नसले तरी महाराष्ट्र आणि मराठी माणूस यांच्याबद्दल त्यांनी आवाज उठवला होता. बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म १०० वर्षांपूर्वी २३ जानेवारी १९२६ रोजी पुणे येथे झाला. महाराष्ट्रात जेव्हा मराठी माणसाची उपेक्षा होण्यास सुरुवात झाली आणि परप्रांतीयांचे लोंढे मुंबईमध्ये घुसू लागले, तेव्हा बाळासाहेब ठाकरे नावाचा योद्धा मराठी माणसांच्या न्याय आणि हक्कासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांसमोर उभा ठाकला. छत्रपती शिवरायांच्या पावन भूमीत म्हणजेच महाराष्ट्रभूमीत नवे क्रांतिकारक पर्व सुरु झाले, ते म्हणजे ठाकरे पर्व ! या ठाकरे पर्वाने अनेक राजकीय पक्षांना पदच्युत केले आणि शिवसेनेचे नाव जगभर प्रसिद्ध झाले. आज १०० वर्षांनंतर बाळासाहेबांनी रुजवलेली शिवसेना दोन गटांत विभागली आहे, ही मराठी माणसाची शोकांतिका आहे.

बाळासाहेब हे उत्कृष्ट पत्रकार, जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार आणि पट्टीचे वक्ते, कुशल संघटक, प्रसिद्ध राजकारणी होते. बाळासाहेबांच्या व्यंगचित्रांनी मराठी माणसाला जागृत केले. तत्कालिन मराठी माणूस बाळासाहेबांचे विचार व्यंगचित्रांतून समजावून घेत राहिला. लोक बाळासाहेबांकडे समस्या, अडचणी मांडण्यासाठी घरी येऊ लागले. बाळासाहेबांचे वडील प्रबोधनकार ठाकरे हेही महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार होत. प्रबोधनकारांनी बाळकडे घरी येत असलेले लोक पाहिले आणि बाळासाहेबांना म्हणाले, बाळ, ही माणसे जपून ठेव. हीच आपली संपत्ती आहे. बाळासाहेबांनी मराठी माणसाचे संघटन करण्यास सुरुवात केली होती. या संघटनेला नावही प्रबोधनकारांनी सुचवले, ते नाव म्हणजे शिवसेना होय. आज शिवसेना म्हटले कि, मराठी माणूस अन्यायाविरोधात पेटून उठतो, त्याचे रक्त सळसळते. ही जादू आहे, बाळासाहेबांच्या परखड, स्वाभिमानी विचारांची. शिवसेनेची स्थापना दि. १९ जून १९६६ रोजी झाली. मराठी माणसाला न्याय आणि हक्क यांची जाणीव करून देण्याची लढाई बाळासाहेबांनी सुरु केली होती. अनेक लढायांचे हे एक युद्ध होते आणि बाळासाहेब ते युद्ध जिंकले. जे बोलेन ते स्पष्ट आणि सत्य असे त्यांचे विचार होते.

बाळासाहेबांकडे अनेकजण फक्त राजकारणी म्हणून पाहतात, परंतु बाळासाहेब दूरदृष्टीचे द्रष्टे होते. ज्यांचे विचार महाराष्ट्रविरोधी होते, त्यांच्यावर आपल्या वाणी, लेखणीने आणि ब्रशच्या फटकाऱ्यानी त्यांनी प्रहार केले. बाळासाहेबांनी त्यांच्यासमोर नेहमीच छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवला होता. महाराष्ट्र धर्म वाढवावा, मराठी तितुका मिळवावा, हे सूत्र त्यांनी समोर ठेवले आणि अवघा महाराष्ट्र शिवसेनेच्या पाठीमागे उभा राहिला. तत्कालिन मराठीद्वेष्टे राजकारणी आणि उद्योगपती यांना अद्दल घडवण्याचे काम बाळासाहेबांनी केले. त्याचवेळी बाळासाहेबांबद्दल निंदा नालस्ती एका विशिष्ट वर्गाने सुरु केली होती. यशस्वी माणसाला अनेक छुपे शत्रू असतात. बाळासाहेबांच्या समोर शत्रूचे काहीच चालले नाही. परंतु कालौघात बाळासाहेबांचा वारसा चिरंजीव उद्धव ठाकरेंकडे आला आणि शिवसेनेत बदल दिसू लागले. तरीही उद्धव ठाकरे हे मराठी मातीशी इमान राखणारे नेते ठरले. परंतु माणसांची नियत बदलल्यावर त्याला उद्धव तरी काय करणार ? प्रत्येकाला इच्छा होती की, शिवसेनेचे नेतृत्व आपल्याकडेच पाहिजे, पण तसे होत नाही. शिवसेना ही बाळासाहेबांचीच होती. ती त्यांच्या कष्टातून, घामातून तयार झाली होती. बाळासाहेबांशिवाय शिवसेनेचे नेतृत्व दुसर्या कुणी करू नये, हे मराठी माणसांनी ठरवले होते. शिवसेनेचे नेतृत्व जेव्हा बाळासाहेब ठाकरेंसारखे निर्माण होईल, त्याचवेळी शिवसेना उर्जितावस्थेत येईल.

शिवसेना म्हणजे, बाळासाहेब ठाकरे हे सूत्र होते. बाळासाहेब स्वर्गवासी झाल्यानंतर विरोधकांनी शिवसेनेला विकलांग करण्याचा प्रयत्न झाला. काही जणांचा आत्मविश्वास वाढला, या अति आत्मविश्वासाने शिवसेना डळमळीत झाली. म्हणून शिवसणीचे महत्व कधी कमी होत नाही. जेव्हा, महाराष्ट्रात १९६० सारखी राजकीय स्थिती येईल, त्यावेळी मराठी माणूस बाळासाहेबांच्या प्रतिमेसमोर रडेल. त्यावेळी त्याचा काही उपयोग होईल, असे वाटत नाही. तोपर्यंत मराठी माणसाचे मुंबई व महाराष्ट्रातील महत्व कमी झालेले असेल. मराठी माणसांची बाजू मांडणारा, त्यांना न्याय मिळवून देणारा नेता बाळासाहेबांच्या रूपाने मिळाला होता; परंतु बाळासाहेबांनी उभारलेली शिवसेना मराठी माणसाने टिकवली नाही. टिकवणे म्हणजे ताब्यात घेणे नव्हे, शिवसेनेत जान ओतणे होय. आज महाराष्ट्रात मराठी माणसाला प्रतिष्ठा मिळाली आहे, ती बाळासाहेबांमुळेच ! शिवसेनेचे विरोधकही खाजगीत ही गोष्ट मान्य करतात. म्हणूनच बाळासाहेब मराठी मनाचे आजही हृदयसम्राट आहेत.


आजही शिवसेनेच्या कार्यपद्धतीचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी परदेशातून अनेक समाजशास्त्राचे अभ्यासक भारतात येत असतात. बाळासाहेबांबद्दल जगभर आकर्षण आहे. गेली ६० वर्षे शिवसेनेचे कार्य सुरु आहे. आजही शिवसेनेची पताका बाळासाहेबांच्या विचाराने डौलाने राजकीय क्षितिजावर फडकत आहे. बाळासाहेब फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रे देत. परंतु अमराठी व्यवस्थापकांची धोरणे आणि व्यंगचित्रांवर आणलेली बंधने त्यांना मान्य झाली नाहीत. त्यांचा स्वभाव बाणेदार, स्वाभिमानी असल्यामुळे तेथून बाहेर पडून 'मार्मिक' हे व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केले. या साप्ताहिकातील बाळासाहेब व श्रीकांत ठाकरेंची व्यंगचित्रे, अग्रलेख आणि निर्भीड लेखांनी धमाल उडवून दिली. मराठी माणसाला मार्मिक जवळचा वाटू लागला. त्यातूनच बाळासाहेबांनी 'मराठी माणसा जागा हो' ची हाक दिली. शिवसैनिक मोठ्या ऊर्जेने कामाला लागले. त्यावेळी प्रतिकूल परिस्थिती होती, साधने कमी असत. मुंबईत कम्युनिस्ट व काँग्रेसचे वर्चस्व होते. पण ते मराठी माणसाला डावलून सर्व काही करत होते. अशा वेळी मार्मिकने मराठी माणसाच्या न्याय व हक्काची बाजू मांडायला सुरुवात केली, मराठी माणूस बाळासाहेबांकडे अडीअडचणी सोडवण्यासाठी येऊ लागला. बाळासाहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपले शिवसैनिक उतरवले. शिवसेनेच्या अथक प्रयत्नाने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांचे स्वप्न भंगले. शिवसेनेला त्यावेळी मोठा संघर्ष तत्कालीन व्यवस्थेशी करावा लागला होता, हे कोणीही शिवसैनिकांनी विसरू नये. कारण या संघर्षात शिवसेनेचे अनेकजण शहीद झाले होते, त्यांच्या जीवावरच आज महाराष्ट्र निर्धाराने उभा आहे. आज शिवसेना हा राजकीय पक्ष दुभंगला आहे. सध्या शिवसेनेचे नेतृत्व एकनाथ शिंदे गटाकडे आहे, व्यवस्थेने शिवसेनेचे चिन्हाही त्यांना दिले आहे. तो वाद न्यायप्रविष्ट आहे, तो केव्हा सुटणार ? शिवसेना ही पूर्वी जगातील मोठी यशस्वी संघटना होती. बाळासाहेबांनी मराठी माणसासाठी खूप काही केले, आपण त्यांच्या विचारांशी द्रोह करणे चुकीचे आहे. काहीजण टीका करतात की, शिवसेनेने हिंदुत्व सोडले आहे काय ? परंतु शिवसेना असे काहीही करणार नाही. हिंदुत्व हाच शिवसेनेचा गाभा आहे. काहीजण स्वार्थासाठी हिंदुत्वाचा आधार घेत असतील, परंतु शिवसेनेने नेहमीच हिंदुत्व आणि मराठी माणसांचे हित पाहिले आहे. शिवसेनेचे हिंदुत्व कोणाला समजले आहे की नाही, समजत नाही. त्यांचे हिंदुत्व सर्व समावेशक होते.

बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेचे संघटन झाल्यानंतर दैनिक सामनाची स्थापना केली. बाळासाहेबांनी मोरारजी देसाईंवर काढलेले व्यंगचित्र गाजले होते. अनेक कवटयांवर मोरारजी बसले आहेत, असे व्यंगचित्र होते. त्यामुळे मोरारजी मनातून खजील झाले होते. बाळासाहेबांची व्यंगचित्रे बोचरी, वाघाच्या पंजाचा फटकारा मारणारी होती. बाळासाहेबानी शिवसेनेची सत्ता आल्यानंतर महाराष्ट्रात विकासाची कामे केली. आज जे महाराष्ट्रातील प्रशस्त रस्ते, मुंबईतील विकास दिसत आहे, ते बाळासाहेबांमुळेच ! सीमा प्रश्न, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न, मुंबई दंगलीत मराठी माणसाला न्याय, राज्यातील विविध विकासाची कामे बाळासाहेबांनी केली. दैनिक सामनाने अनिष्ट राजकारण आणि महाराष्ट्रद्वेष्ट्या भूमिकेला नेहमीच विरोध केला आणि महाराष्ट्र व मराठी माणसाचे हित पाहिले. त्यामुळे बाळासाहेब सर्वांना जवळचे वाटू लागले. जगातील अनेक नामवंत बाळासाहेबांना भेटू इच्छित होते. बाळासाहेब नावाचे आकर्षण, प्रतिमा आणि कर्तृत्व अनेकांना प्रेरीत करून गेले. कलाप्रेमी, दुसऱ्यांना संकटातून सोडवण्याचा स्वभाव, राजकारणाचा अचूक अभ्यास, दूरदृष्टी, फर्डा वक्ता, कलाकार, स्पष्टवक्ता असे बाळासाहेबांचे महत्वाचे गुण होते.

बाळासाहेबांनी एकदा बोललेले शब्द म्हणजे धनुष्यातून सुटलेला बाण असायचा. बाबरी मशिदीच्या वेळी बाळासाहेबांना विचारले होते कि, मशीद पाडण्यात शिवसैनिक होते का ? त्यावेळी बाळासाहेब म्हणाले, शिवसैनिक असतील तर अभिमानच आहे. ज्यावेळी दुसऱ्या हिंदुत्ववादी म्हणवणार्या राजकीय पक्षाने बाबरी पाडण्याची जबादारी नाकारली होती, त्यावेळी बाळासाहेबांनी ती जबाबदारी उचलली. बाळासाहेबांचे शत्रूही त्यांना मानत असत. बाळासाहेबांसारखे अष्टपैलू व्यक्तिमत्व एखादेच घडते. बाळासाहेब लोकांच्या मनात नेहमीच हिंदू हृदयसम्राट म्हणून राहतील. आज शिवसेनेची ताकद दुभंगली असली तरी पुन्हा राज्यात शिवसेनेचे युग आणणे ही शिवसेनेतील नेत्यांची जबाबदारी आहे. कारण प्रादेशिक पक्ष निर्मितीला खूप काळ जावा लागतो. तो सहजासहजी निर्माण होत नाही. प्रल्हाद केशव अत्र्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर, असा हिंदू हृदयसम्राट गेल्या १० हजार वर्षांत झाला नाही आणि यापुढे १० हजार वर्षांत होणार नाही.

# कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापनदिन!

सैनिकांनी सवारसाठी स्थापन केलेल्या जगातील एकमेव बँक म्हणून गेल्या चार दशकाहून अधिक काळ राज्याच्या सहकार क्षेत्रात, आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केलेल्या कर्नल आर. डी. निकम सैनिकसहकारी बँकेचा ४१ वा वर्धापन दिन! त्यानिमित्त...





२३ जानेवारी १९८५ रोजी स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांचे जयंतीचे औचित्य साधून सैनिकांसह सर्वसामान्य व समाजातील दुर्बल घटकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्मा उद्देशाने कर्नल आर. डी. निकम व त्मांच्या सहका-यांनी प्रखर देशभ३ती ते सामाजिक कार्याने जगातील पहिली सैनिक सहकारी बँकेची स्थापना केली. सातारा जिल्ह्यातील आठ गावे कार्यक्षेत्र घेऊन सुरु केलेली बँक महाराष्ट्र भर कार्यक्षेत्रासह मुख्मालम व बावीस शाखाद्वारे बँकिंग सुविधा देत आहे. सभासदांच्मा मागणीखातर २००८ साली बँकेचा कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक लि. असा नामविस्तार झाला. सहकार क्षेत्रातील शिस्तप्रिय बँक म्हणून आपला नावलौकिक निर्माण केला आहे.

बँकिंग क्षेत्रात गेल्या काही वर्षात आमुलाग्र बदल झाले. बँकेचे चेअरमन कॅप्टन उदाजी निकम मांच्मा मार्गदर्शनाखाली आधुनिकतेची कास धरून कोअर बँकिंग, आर. टी. जी., एस, एन ई एफ टी, रुपे डेबीट कार्ड, ई कॉमर्स ,पॉस, क्यू आर कोड, एस.एम.एस अलर्ट सह सर्व प्रकारच्मा डिपॉझीट व कर्जाच्या स्कीम उपलब्ध करून दिल्या. लवकरच मोबाईल बँकिंग युपीआय या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

बँकेचे डिसेंबर २०२५ अखेर ५५९५८ सभासद असून भागभांडवल रु.१६ कोटी ०५ लाख आहे. ठेवी रू.३३२ कोटी ९५ लाख असून कर्जे रु. २२० कोटी ३८ लाख आहेत. बँकेने आपला मिश्र व्यवसाम रू. ५५३ कोटी पूर्ण केला असून लवकरच रू. १००० कोटींचा व्यवसाय पूर्ण करण्याचा मानस आहे. संपूर्ण बँकिंग व मुख्यत्वे सहकारी बँकिंग श्रेत्रातील वाढत्या स्पर्धेमध्ये बँकेच्या विविध योजनांच्मा माध्यमातून गाहकांना विनम्र आणि उत्तम सेवा देण्यात बँक नेहमीच अग्रेसर राहिली आहे.कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँकेवर ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, सभासद हितचिंतक मांनी जो विश्वास दाखविला आहे त्मामुळेच बँकेचा व्यवसाय वाढ होण्यास मदत झालेली आहे त्यामुळे बँक अधिक बळकट होत आहे.

ग्राहकांना अधिक सुलभ सेवा देण्माकरिता अल्पावधीतच मोबाईल बँकिंग युपीआय सुविधा सुरु करण्यात येणार आहे. शिस्त आणि पारदर्शकता तसेच आधुनिक बँकिंग मांचा यो१/२य समन्वम साधल्मामुळेच कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँकेचा आलेख सतत उंचावत आहे. आगामी काळात देखील शाखा विस्ताराच्या माध्ममातून तसेच खाजगी आणि राष्ट्रियकृत बँका देत असलेल्या आधुनिक सेवा सुविधा कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँक ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा बँकेचे चेअरमन कॅप्टन उदाजी निकम यांचा व त्यांच्मा संचालक मंडळाचा तसेच व्यवस्थापनाचा मानस आहे.

## शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील स्क्रॅप व निरूपयोगी साहित्याची विक्रीबाबत आवाहन

**सातारा/प्रतिनिधी:-**

शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था सातारा या संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांनी प्रात्यक्षिकासाठी वापरलेले एम.एस. स्क्रॅप व निरूपयोगी हत्यारे व उपकरणे साहित्याची विक्रीबाबत कमी संख्येने निविदा प्राप्त झाल्याने पून्हा निविदा मागविण्यात येत आहेत. त्याकरीता इच्छुक निविदा धारकांनी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्क्रॅप साहित्याची पहाणी करावी. इच्छूक निविदा धारकांसाठी निविदा २८ जानेवारीपर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत मागविणेबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. याबाबत अटी व सुचना कार्यालयामध्ये सुध्दा उपलब्ध होतील, संस्थेमध्ये प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील. सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार शासकीय प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, सातारा यांनी त्यांच्या कडे राखून ठेवला आहे असेही, सातारा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्यांनी कळविले आहे.

## बक्षी हिप्परगा येथे ग्लोबल व्हिलेजच्या वतीने सर्वरोग निदान आरोग्य शिबीर संपन्न

**सोलापूर/ प्रतिनिधी:-**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी व अश्विनी रुरल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, कुंभारी यांच्या वतीने मौजे बक्षी हिप्परगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व रोग निदान आरोग्य शिबिर गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाले.



अश्विनी रुरल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, कुंभारीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर करजखेडे यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी होते.

या आरोग्य निदान शिबिरात डॉ. आनंदराव आगलावे, डॉ. पूर्वा घोवारीकर, डॉ. अमेय साखरकारकर, डॉ. सरफराज खान, डॉ. आदर्श शिरा, डॉ. मिलिंद सानेर यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधपचार व मार्गदर्शन केले.

या सर्व रोग निदान शिबिरात २६५ ग्रामस्थ, विद्यार्थी व आबालवृद्ध रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांना पी.आर.ओ. सौ. साधना साळवे, सौ. रूपाली स्वामी, सौ. ज्योती जोगुरे व फार्मासिस्ट श्री. नल्ला बिलाल यांनी सहकार्य केले.

आरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. सोमनाथ स्वामी, कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रदीप राठोड, प्रा. पंढरीनाथ हरिदास, श्री. जुबेर चौकी यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# दावोस येथे अदाणी समूहाकडून महाराष्ट्रासाठी ६६ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणूक प्रस्तावांची घोषणा

स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित ५६व्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (डब्ल्यूईएफ) च्या वार्षिक बैठकीदरम्यान अदाणी समूहाने महाराष्ट्रासाठी ६६ अब्ज डॉलर्स (सुमारे ६ लाख कोटी रुपये) गुंतवणुकीची रूपरेषा मांडली. हा या वर्षी जागतिक व्यासपीठावर कोणत्याही राज्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या गुंतवणूक प्रस्तावांपैकी एक मानला जात आहे. ही गुंतवणूक योजना महाराष्ट्र सरकारसोबत करण्यात आलेल्या विविध सामंजस्य करारांद्वारे (एमओयू) औपचारिक करण्यात आली आहे.

प्रस्तावित गुंतवणूकएव्हिएशन, स्वच्छ ऊर्जा, शहर पायाभूत सुविधा, डिजिटल प्लॅटफॉर्म तसेच आधुनिक उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग)अशा विविध क्षेत्रांमध्ये केली जाणार आहे. ही गुंतवणूक पुढील दहा वर्षांत टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, महाराष्ट्राला भारतातील सर्वात मजबूत अर्थव्यवस्था आणि जगातील प्रमुख प्रादेशिक अर्थव्यवस्थांमध्ये कायम ठेवण्याचा या गुंतवणुकीचा उद्देश आहे. या योजना एकात्मिक (इंटिग्रेटेड) पायाभूत सुविधा मॉडेलवर आधारित आहेत.

दावोस येथे माध्यमांशी संवाद साधताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, महाराष्ट्र राज्य अशा दीर्घकालीन गुंतवणूकदारांचे स्वागत करते, जे राज्याच्या विकासात्मक प्राधान्यांशी सुसंगतपणे पुढे जाण्यास इच्छुक आहेत. सातत्यपूर्ण गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात, कौशल्य विकासाला बळकटी मिळते आणि राज्यातील विकासाची गती कायम राहते.

एमओयूवर प्रतिक्रिया देताना अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) चे संचालक प्रणव अदाणी यांनी सांगितले,महाराष्ट्रातील अदाणी समूहाच्या गुंतवणुकीची आखणी दीर्घकालीन दृष्टीकोनातून करण्यात आली आहे. पुढील ७ ते १० वर्षांत आर्थिक विकास, ऊर्जा परिवर्तन (एनर्जी ट्रान्सफॉर्मेशन) आणि डिजिटल विस्ताराला बळकटी देणारे, भविष्यासाठी सज्ज असे पायाभूत सुविधा प्लॅटफॉर्म उभारण्यावर या गुंतवणुकीचा भर आहे.

महाराष्ट्राच्या या योजनेत शहरी परिवर्तन आणि नव्या पिढीच्या पायाभूत सुविधांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी शहरी पुनर्विकास योजनांपैकी एक असलेलीधारावी पुनर्विकास योजनाही व्यापक, समावेशक आणि शहर परिवर्तनाच्या (सिटी ट्रान्सफॉर्मेशन) मॉडेल म्हणून पाहिली जात आहे.तसेचनवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए)२५ डिसेंबर २०२५ पासून कार्यान्वित झाल्यानंतर नवी मुंबई एक नवे ग्रोथ हब म्हणून उदयास येत आहे. ग्रीनफील्ड आणि मल्टी-मॉडल एव्हिएशन हब म्हणून विकसित करण्यात आलेला हा प्रकल्पमुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर)जिथे सुमारे २.५ कोटी लोक राहतातलॉजिस्टिक्स, कमर्शियल आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्राला नवी गती देईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या गुंतवणूक योजनेतग्रीन इंटीग्रेटेड डेटा सेंटर पार्कउभारण्याचाही प्रस्ताव समाविष्ट असून, त्यांची एकूण क्षमता सुमारे३,००० मेगावॅटइतकी असेल. याशिवाय, विमानतळाजवळ एक विशेषइंटीग्रेटेड एरिनाआणिकमर्शियल क्षेत्रविकसित करण्याची योजनाही या गुंतवणुकीचा भाग आहे.या योजनेतस्वच्छ तसेच ट्रांझिशनल ऊर्जाक्षेत्रालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रस्तावित प्रकल्पांमध्ये एकूण८,७०० मेगावॅट क्षमतेच्या पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पां, कोळसा गॅसिफिकेशन उपक्रम, तसेच प्रस्तावितसेमीकंडक्टर आणि डिस्प्ले फॅब्रिकेशन सुविधासुरू करण्याचाही समावेश आहे.एकूण६६ अब्ज डॉलर्सचे हे गुंतवणूक पोर्टफोलिओ महाराष्ट्राला अदाणी समूहाच्या पुढील विकास टप्प्याच्या केंद्रस्थानी आणते. दावोस येथे जागतिक नेते स्थैर्य, शाश्वत विकास आणि स्पर्धात्मकतेवर चर्चा करत असताना, महाराष्ट्राबाबत अदाणी समूहाच्या या योजनेतून स्पष्ट संकेत मिळतो की भारताचा पायाभूत सुविधांवर आधारित विकास पुढेइंटीग्रेटेड प्लॅटफॉर्म्स, दीर्घकालीन भांडवलआणि अशाभागीदाऱ्यांद्वारे आकार घेईल, ज्या प्रादेशिक विकासाला जागतिक संधींशी जोडतील.

## वटवृक्ष देवस्थानच्या कार्यातून 'धर्म,अध्यात्म व समाजसेवेचा' त्रिवेणी संगम अनुभवला:आ.तानाजी सावंत

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या माध्यमातून मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी असंख्य गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधेसह निवासाची व्यवस्था संस्थानच्या वतीने करत असल्याचे समजले होते. समाज कार्य करणाऱ्या व स्वामीवर गाढ श्रद्धा ठेवून अध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीला भेटल्याचा आनंद झाला. त्यांची कल्पकता त्यांचा दूरदृष्टीकोन व भविष्यातील अनेक योजना ऐकून मी भावूक झालो. आज स्वामी दर्शनानंतर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कार्यातून 'धर्म, अध्यात्म व समाजसेवेचा' त्रिवेणी संगम अनुभवला असल्याचे मनोगत धाराशिव विधानसभा मतदार संघ



आमदार तानाजी सावंत यांचा देवस्थान कार्यालयात सत्कार करताना महेश इंगळे दिसत आहेत.

शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी व्यक्त केले. आज येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कार्यालयात आमदार तानाजी सावंत

यांची अध्यक्ष महेश इंगळे यांच्याशी सदीच्छा भेट झाली. या प्रसंगी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आमदार तानाजी सावंत यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना आमदार तानाजी सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पुढे बोलताना आमदार तानाजी सावंत यांनी ज्यांच्यामुळे सर्व योग जुळून आला ते माझे आराध्य दैवत श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या कृपादृष्टीने स्वामी दर्शनाचा व महेश इंगळे यांच्या हस्ते सन्मानीत होण्याचे भाग्य लाभले त्यामुळे मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या आदर्शवत कार्य पाहून आपण भारावलो असल्याचे मनोगतही आमदार तानाजी सावंत यांनी व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, इत्यादी उपस्थित होते.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# पाटणला जि.प.गटाचे सर्व अर्ज वैध..

## पं.स. गण गोकुळ तर्फ हेळवाक मधील एक अर्ज अवैध

**पाटण/प्रतिनिधी:–**

पाटणला जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी झालेल्या छाननीत जिल्हा परिषद गटातून भरलेल्या सर्वच्या सर्व ४९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. तर पंचायत समितीच्या गणासाठी एकूण आलेल्या ९२ अर्जापैकी गोकुळ तर्फ हेळवाक गणातील सुमन शामराव कदम यांचा एकमेव अर्ज अवैध ठरला. २७ जानेवारी पर्यंत अर्ज माघार घेण्याची मुदत असून या निवडणुकांचे चित्र २७ जानेवारी नंतरच स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत निवडणूक लढण्यासाठी व माघारी साठी कार्यकर्ते व उमेदवारांचे घडामोडी नाट्य पहायला मिळणार आहे. अर्ज छाननीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह निवडणूक कार्यालय परिसरात कार्यकर्ते व उमेदवारांची गर्दी झाली होती.

जिल्हा परिषद गटासाठी वैध ठरलेले उमेदवारांचे अर्ज पुढील प्रमाणे

४७ गोकुळ तर्फ हेळवाक जि.प.गट– १) अशोक दगडू पाटील २) सावळाराम यशवंत लाड ३) विठ्ठल चिमाजी यमकर ४) संतोष रामचंद्र कदमस ५) विक्रमसिंह बाळासाहेब पाटणकर ६) नरेश विठ्ठल देसाई ७) विष्णु लक्ष्मण सपकाळ ८) शिवाजी भिमाजी कांबळे ९) दत्तात्रय शंकर कदम १०) राजाराम देवबा शेलार ११) स्नेहल प्रविण गुरव १२) महेश रामचंद्र शेलार १३) प्रविण चंद्रकांत गुरव

४८ तारळे जि.प.गट– १) स्वप्ना अभिजीत पाटील २) सुरेखा तुषार पाटील ३) क्रांती बबन साळुंखे ४) रेखा संजय घाडगे

४९ म्हावशी जि.प.गट– १) भरत शंकर साळुंखे २) जयदिप विष्णू जाधव ३) संजय किसन सपकाळ ४) भरत जगन्नाथ ढेरे ५) राजेश वसंत पवार ६) विक्रमसिंह बाळासाहेब पाटणकर ७) महेश मारुती तोडकर ८) अरविंद शांताराम महाबळ

५० मल्हारपेठ जि.प.गट– १) प्रेरणा प्रकाश पवार २) विजया नानासो कुंभार ३) अंजना पंढरीनाथ माने ४) कोमल सतिश सपकाळ ५) सुजाता कमलाकर कुंभार ६) भाग्यश्री योगेश हिरवे

५१ मारुल हवेली जि.प.गट – १) योगिता संतोष गिरी २) विजया विलास गोसावी ३) प्राची शेखर फुटाणे ४) वैशाली शांताराम गुरव

५२ मंद्रुळ कोळे जि.प.गट– १) सुवर्णा अविनाश पाटील २) मृणाल पाटील ३) सिमा मनोज पाटील ४) प्राची नरेंद्र पाटील ५) अश्विनी कृष्णत पाटील ६) नयन पाटील

५३ काळगांव जि.प.गट– १) वैशाली संतोष पवार, २) सुनिता तानाजी चाळके ३) दिपाली पद्माकर देब, ४) सिताबाई चंद्रकांत मोडक ५) प्राजक्ता भरत पाटील, ६) मेघना आदित्यनाथ माने ७) सुवर्णा प्रविण पाटील,८) कविता सतिश कचरे

पंचायत समिती गणासाठी वैध ठरलेले उमेदवारांचे अर्ज पुढील प्रमाणे

१९३ गोकुळ तर्फ हेळवाक पं.स. गण– १) रोहिणी दिलीप माने २) मंगल दिलीप माने ३) पूनम माने ४) योगिनी सुधीर कारंडे ५) वैशाली बबन कांबळे ६) संगिता अरविंद नाईकडे ७) सुनिता विजयकुमार साठे ८) रेखा संजय चव्हाण ९) अनुजा चंद्रकांत कांबळे

९४ येराड पं.स.गण– १) विद्दया तुकाराम शिंदे २) सिमा संतोष शिंदे ३) वंदना सुनिल शिंदे ४) सोनाली सर्जेराव साळुंखे ५) सुनिता भरत शिंदे ६) रिया प्रकाश कांबळे ७) सुनिता संदिप पवार

९५ मुरुड पं.स.गण– १) सविता विजय पवार २) सोनाली अतुल देशमुख ३) निलम रोहित पवार ४) रेखा संजय घाडगे ५) त्रिशला सोमनाथ काळकुटे ६) रुपाली सुनिल निकम

९६ तारळे पंस.गण– १) विकास हरीभाऊ जाधव २) संग्राम विकास जाधव ३) अभिजीत शंकरराव जाधव

९७ म्हावशी पं.स.गण– १) मंगेश रामचंद्र मोळावडे २) सचिन शंकर सलते ३) शंकर बाबुराव घाडगे ४) जगदीश उमाजी जाधव ५) शिवाजी परशुराम साळुंखे

९८ चाफळ पं.स.गण– १) राधीका प्रशांत पाटील २) सोनम सागर कुंभार ३) सोनल संजयकुमार महिपाल ४) जयश्री राजेंद्र बोडके ५) कमल प्रकाश झोरे

९९ मल्हारपेठ पं.स.गण– १) नीता संतोष यादव २) अश्विनी रविराज पाटील ३) अर्चना अमोल पाटील ४) सुजाता सुरेश पानस्कर ५) सुप्रिया अविनाश पाटील ६) धनश्री भानुप्रताप कदम ७) सुमन मोहन चव्हाण

१०० नाडे पं.स.गण– १) विकास संभाजी कदम २) प्रकाश हरीबा पवार ३) विजय भाऊसो पवार ४) पांडूरंग बबन शिरवाडकर ५) चंद्रशेखर सखाराम ढवळे ६) विनायक शंकर माथने

१०१ मारुल हवेली पं.स.गण– १) विद्या महेश सूर्यवंशी २) प्रियांका विक्रमसिंह देसाई ३) सुजाता उमेश देसाई ४) पुनम रणजित मोरे ५) जयश्री अमोल पाटील ६) स्वाती विक्रम देसाई

१०२ नाटोशी पं.स.गण– १) प्रशांत श्रीरंग पवार २) ओमकार प्रशांत पवार ३) शांताराम दिलीप सुर्वे ४) रंगराव रामचंद्र जाधव ५) देवजी लक्ष्मण पवार ६) सिताराम ज्ञानदेव मोरे ७) आनंदा दादू रोकडे

१०३ सणबूर पं.स.गण– १) संपदा संदिप जाधव २) नंदा कृष्णाजी शेडगे ३) आकांक्षा दिनकर खेडेकर ४) आकांक्षा दिनकर खेडेकर ५) वनिता अशोक चव्हाण

१०४ मंद्रुळ कोळे पं.स.गण– १) नितीन दत्तात्रय काळे २) दिलीप बाबुराव पाटील ३) विलास शिवराम सावंत ४) रविंद्र नामदेव कांबळे ५) अमरजित हणमंत पाटील ६) दत्तात्रय केशव काळे ७) नितिन हिंदूराव पाटील ८) अभिजित हिंदूराव पाटील ९) साहिल भालेकर

१०५ कुंभारगांव पं.स.गण– १) सुरज कृष्णत पाटील २) सचिन गणपती यादव ३) तुकाराम लक्ष्मण धुमाळ४) रमेश विठ्ठल मोरे ५) बाबुराव तातोबा हरुगडे ६) संजय बापू कळंत्रे ७) आदित्य गणेश मोरे

१०६ काळगांव पं.स.गण– १) गोविंद हरी गोटुगडे २) संदीप राजाराम माने ३) पंजाबराव हंबीरराव देसाई ४) अनिल हरी डाकवे ५) वैभव वामनराव काळे ६) सुरेशचंद्र शिवाजीराव काळे ७) नानासो बाबूराव सावंत ८) नानासो बाबूराव सावंत ९) सतिश दाजी पाटील


डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह पाटण येथे जि. प. आणि पं. स. निवडणूक प्रक्रिया सुरू आहे.

# फलटण मध्ये जि.प.-पं.स. निवडणूक रणधुमाळी!

## २४ जागांसाठी १७५ अर्ज वैध

**फलटण/अनमोल जगताप:–**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा आखाडा चांगलाच तापला असून उमेदवारी अर्ज छाननीच्या अखेरच्या दिवशी फलटणमध्ये राजकीय शक्तिप्रदर्शनाचा अक्षरशः स्फोट झाला. बुधवारी अधिकारगृह इमारत परिसर इच्छुक उमेदवार, नेते, कार्यकर्ते आणि समर्थकांनी अक्षरशः फुलून गेला होता. घोषणाबाजी, झेंडे, वाहनांच्या ताफ्यांमुळे संपूर्ण परिसर निवडणुकीच्या रणांगणात परिवर्तित झाला होता.

फलटण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ८ गटांसाठी ६४ अर्ज तर पंचायत समितीच्या १६ गणांसाठी १११ अर्ज दाखल झाले होते. एकूण २४ जागांसाठी तब्बल १७५ उमेदवारी अर्ज वैध ठरले, तर केवळ २ अर्ज अवैध ठरल्याची अधिकृत माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. अर्जांची संख्या पाहता प्रत्येक मतदारसंघात अटीतटीची आणि थेट लढत अटळ ठरली आहे.

**पक्षनिहाय अर्जांचा पाऊस; सर्वच पक्ष मैदानात**

या निवडणुकीत सर्व प्रमुख पक्षांनी आपली ताकद पणाला लावली असून अर्ज दाखल करण्यात मोठी चुरस पाहायला मिळाली.

भाजप – ६ गट, १२ गण

राष्ट्रवादी काँग्रेस – २ गट, ४ गण

शिवसेना – ८ गट, १६ गण

राष्ट्रीय समाज पक्ष – ५ गट, ७ गण

काँग्रेस व अपक्ष –लक्षणीय सहभाग

या आकडेवारीमुळे फलटण तालुक्यातील प्रत्येक गट आणि गणात राजकीय संघर्ष तीव्र होणार हे स्पष्ट झाले आहे.

**राजघराण्याचा थेट निवडणुकीतून काढता पाय; पण व्यूहरचना तयार!**

१९९२ पासून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये सातत्याने वर्चस्व राखणाऱ्या नाईक




निंबाळकर राजघराण्यातील कोणीही यावेळी थेट निवडणूक रिंगणात उतरलेले नाही.

माजी जि.प. अध्यक्ष श्रीगंत संजीवराजे नाईक निंबाळकर, माजी सभापती श्रीमंत विश्वजितराजे नाईक निंबाळकर, माजी जि.प. सदस्या श्रीमंत सौ. शिवांजलीराजे नाईक निंबाळकर तसेच माजी खासदार हिंदुराव नाईक निंबाळकर यांच्या कुटुंबातील सदस्यांनी उमेदवारी टाळली आहे.

मात्र, शिवसेनेच्या माध्यमातून राजघराण्याने संपूर्ण ताकदीने व्यूहरचना आखली असून, सत्ता टिकवण्यासाठी प्रत्येक मतदारसंघात रणनीतीपूर्वक हालचाली सुरू असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

**कदम घराण्याचा राजकीय भूकंप!**

फलटणच्या राजकारणात मोठा ट्विस्ट देणारी घडामोड म्हणजे दिवंगत माजी आमदार चिमणराव कदम यांचे सुपुत्र सह्याद्री चिमणराव कदम यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम ठोकत शिवसेनेत प्रवेश करून उमेदवारी मिळवणे.

या प्रवेशावेळी दिवंगत आमदारांच्या पत्नी, माजी महिला व बालकल्याण सभापती श्रीमती शारदादेवी कदम यांच्यासह मोठा समर्थकवर्ग उपस्थित होता. या निर्णयामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे पूर्णतः ढवळून निघाली आहेत.

**भाजप-राष्ट्रवादी महायुती विरुद्ध शिवसेना : थेट राजकीय सामना**

माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली भाजप-राष्ट्रवादी महायुतीने ज्येष्ठ नेते प्रल्हादराव साळुंखे पाटील, आमदार सचिन पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष समशेरसिंह नाईक निंबाळकर, तालुकाध्यक्ष शिवरूपराजे खर्डेकर यांच्यासह संपूर्ण ताकद मैदानात उतरवली आहे.

तर दुसरीकडे, ३०-३५ वर्षांची सत्तेची परंपरा अबाधित ठेवण्यासाठी राजघराणा-शिवसेना युती सर्वसामान्यांच्या पाठिंब्यावर विश्वास ठेवून थेट लढतीस सज्ज झाली आहे.

**'सत्तेसाठीची निर्णायक लढाई' अटळ!**

उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. अर्जांची संख्या, घराणेशाही विरुद्ध महायुती, पक्षांतरांचे धक्के आणि रणनीतींचा खेळ पाहता फलटण तालुक्यातील जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक ही सत्तेसाठीची निर्णायक आणि ऐतिहासिक लढाई ठरणार, हे आता स्पष्ट झाले आहे.


एत ट्रॅक्टरची माहिती घेताना कृषी प्रदर्शनामध्ये सहभागी झालेले शेतकरी बांधव

# डिझेलविरहित शेतीकडे वाटचाल; कृषी प्रदर्शनात एत ट्रॅक्टर ठरले शेतकऱ्यांचे आकर्षण

**बारामती/प्रतिनिधी :**

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचालित कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे सुरू असलेल्या कृषी प्रदर्शनात बिनआवाजाचे इलेक्ट्रिक (एत) ट्रॅक्टर शेतकऱ्यांचे विशेष आकर्षण ठरत आहेत. डिझेलच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर कमी खर्चात शेतीकामे शक्य करणाऱ्या या ट्रॅक्टरकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसून येत आहे.

आंतरमशागत, नांगरणी, रोटावेटर यांसारख्या शेतीसाठी उपयुक्त असलेल्या २७ व ३२ अश्वशक्तीच्या एत ट्रॅक्टरची माहिती घेण्यासाठी प्रदर्शनस्थळी शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. एका चार्जिंगमध्ये सुमारे चार तास कार्यक्षम राहणारे हे ट्रॅक्टर केवळ २३० रुपये इतक्या मर्यादित खर्चात चार्ज होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये या तंत्रज्ञानाबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहे.

डिझेलविरहित असल्याने इंधन खर्चात बचत, कमी देखभाल खर्च आणि पर्यावरणपूरक वापर ही या ट्रॅक्टरची वैशिष्ट्ये शेतकऱ्यांना उपयुक्त ठरत असल्याचे मत अनेक शेतकरी व्यक्त करत आहेत. आधुनिक शेतीकडे वाटचाल करताना एत ट्रॅक्टर हे भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असेही शेतकरी सांगत आहेत.

एआय आधारित शेती प्रात्यक्षिके, सोलर पॉलीहाउस व आधुनिक कृषी यंत्रसामग्रीसोबत एत ट्रॅक्टर हे या कृषी प्रदर्शनाचे केंद्रबिंदू ठरत असून हे प्रदर्शन शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांसाठी खुले राहणार आहे.

# पशुधन पर्यवेक्षक पदाच्या रिक्त जागा भराव्यात

## वाळवा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदवीधर संघटनेची मागणी

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल सूर्यवंशी, तालुकध्यक्ष अभिजीत शिंदे, डॉ. चिंतामणी निकम पशुसंवर्धन विभाग पुनर्रचनेनंतरच्या पशुधन पर्यवेक्षक पदाच्या रिक्त जागा त्वरित भराव्यात, अशी मागणी वाळवा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदवीधर संघटनेमार्फत करण्यात आली. याबाबतचे निवेदन आ. जयंतराव पाटील यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना झाली असून, त्या अनुषंगाने विभागाचे कार्यक्षेत्र, जबाबदाऱ्या व सेवा व्याप्ती वाढली आहे. तथापि पुनर्रचनेनुसार आवश्यक



असलेली पशुधन पर्यवेक्षक रिक्त पदे ३७७२ इतकी असून, ही पदे अद्याप भरली नाहीत. पशुधन पर्यवेक्षक हे पद ग्रामीण भागातील पशुपालक शेतकरी, तसेच शासनाच्या पशुसंवर्धन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या पदाची भरती अपुरी राहिल्यास विभागाच्या कार्यक्षम तेवर विपरीत परिणाम होऊन योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणार नाही. त्यामुळे ही पदे लवकरात लवकर आयबीपीएस किंवा एमपीएससी मार्फत भरावीत, असे या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विशाल सूर्यवंशी, वाळवा तालुकध्यक्ष अभिजीत शिंदे, डॉ. चिंतामणी निकम यांच्यासह विद्यार्थीही उपस्थित होते.


# जिल्हा परिषदेच्या इमारतीत चक्क दुरुस्तीची कामे

## बांधकाम उत्तर विभागाकडून आचारसंहिता भंग :गणेश अहिवळे यांची तक्रार

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची आचारसंहिता सुरू असताना सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य आणि मागील इमारतीमध्ये चक्क दुरुस्तीची कामे सुरू आहेत .ही कामे सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तरचे कार्यकारी अभियंता मोहसीन मोदी यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत सुरू असून त्यांनी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची उपशहर प्रमुख गणेश अहिवळे यांनी केला आहे .

यासंदर्भात त्यांनी विभागीय आयुक्त महेश पुलकुंडवार वजिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्याकडे तक्रार केली आहे .याबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आली असून या प्रकरणावर येत्या २६ जानेवारी रोजी आईवळे यांनी बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे .आचारसंहिता सुरू असताना सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य दालनांमध्ये चक्क दुरुस्तीची कामे निघावीत याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात होते .ही कामे आचारसंहितापूर्वकाळातली असल्याचे काही जणांचे म्हणणे असले तरी त्याबाबतचा कार्यादेश बांधकाम उत्तर विभागाने उपलब्ध केलेला नाही तसेच या कामांना प्रशासकीय मान्यता नसल्याचा आरोप अहिवळे यांनी केला आहे .या नियमबाह्य कामांची तक्रार झाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे .



या निवेदनात नमूद आहे की मोदी यांनी ऑनलाइन वाटप मीटिंगच्या प्रत्येक तालुक्यातील कामाच्या बोगस याद्या करून कामाचे प्रत्यक्ष वाटप केले नाही ही कामे मर्जीतल्या ठेकेदारांना विकून करोडो रुपये कमवण्यात आल्याचा आरोप आहे जिल्हा परिषदेमध्ये नव्या ठेकेदारांच्या नोंदणीसाठी सुद्धा पैसे गोळा केले जातात असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे ग्राम विकास विभागाचे सचिव व विभागीय आयुक्त यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी अहिवळे यांनी केली आहे.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा अन्यथा, महापालिकेत सोडू

## शीतल लोंढे:नागरिकांचा जीव धोक्यात:तीव्र आंदोलनाचा इशारा

**सांगली / प्रतिनिधी:–**

सांगली शहरासह महापालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला. या कुत्र्यांच्या टोळ्या गल्लो गल्ली झाल्या असून लहान मुलांसह नागरिकांवर हल्ला होत आहे. नुकताच कोल्हापूर रोडवर मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात नागरिक गंभीर जखमी झाला आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने तातडीने याप्रकरणी उपाय योजना कराव्यात अन्यथा, मोकाट कुत्री पकडून महापालिकेत सोडू, असा इशारा मदनभाऊ पाटील युवा मंचचे जिल्हाध्यक्ष शीतल लोंढे यांनी दिला आहे.

महापालिका आयुक्त सत्यम गांधी यांना शीतल लोंढे यांनी निवेदन दिले. यात म्हटले आहे, सांगली शहरात मोकाट, भटक्या कुत्र्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत आहे. सोमवारी भर दिवसा कोल्हापूर रोडवर भटक्या कुत्र्यांचा उच्छाद बघायला मिळाला. कबाडे हॉस्पिटल येथे एका अज्ञात व्यक्तीवर भटक्या कुत्र्याने हल्ला केला. या हल्ल्यात सदरची व्यक्ती ही गंभीर जखमी झाली आहे. शहरात भटक्या कुत्र्याच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. रस्त्यावर, शाळा कॉलेजच्या परिसरात आणि निवासी वसाहतीमध्ये मोकाट फिरणाऱ्या या भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच भीती वाटू लागली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्यानेच हा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रश्नावर आयुक्तांनी स्वतः जातीने लक्ष घालून शहरातील भटक्या कुत्र्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा अन्यथा, मदनभाऊ युवा मंचच्य माध्यमातून तीव्र आंदोलन करत मोकाट, भटकी कुत्री महापालिकेत सोडू, असा इशारा शीतल लोंढे यांनी दिला आहे.

# बुधवार पेठेतून १८ वर्षीय युवती बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहरातील बुधवार पेठ येथे राहणारी नुहा इमरान खान(वय १८) ही युवती दुकानातून काहीतरी घेऊन येते असे सांगून घरातून निघून गेली ती अद्याप पर्यंत घरी परत न आल्याने तिची आई जास्मीन इमरान खान(वय ४०) यांनी शाहूपुरी पोलिसांत मिसिंग ची फिर्याद दिली आहे.ती कोणास आढळल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे,अधिक तपास पोलीस नाईक बोराटे करत आहेत.

# स्व.प्रा.पांडुरंग पुजारी स्मृतीदिनानिमित्त प्रगतशील शेतकरी व पशुपालकांचा गौरव

**कराड/प्रतिनिधी : –**

श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या आदर्श ज्युनिअर कॉलेज, मलकापूर येथे स्व.प्रा. पांडुरंग पुजारी यांचा स्मृतीदिन विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने कराड परिसरातील प्रगतशील शेतकरी व आदर्श पशुपालकांचा गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य प्रदर्शन, हस्तलिखित प्रकाशन व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे माजी प्राध्यापक एम.एस. जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यालय, विजयनगर-मुंढेच्या प्राचार्या सौ.डॉ. इंदिरा घोनमोडे, तसेच कृष्णा सहकारी साखर कारखाना, रेठरे बु. येथील ऊस विकास अधिकारी पंकज पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्व.प्रा. पांडुरंग पुजारी यांच्या प्रतिमेचे पूजन व



दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर जिद्द, कष्ट व नावीन्यपूर्ण प्रयोगांच्या बळावर शेती व पशुपालनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. सन्मानितांमध्ये विठ्ठल मुळगावकर, ज्ञानेश्वर जमाले, सिद्धार्थ पाटील, हणमंत तडाखे, जयवंत पाटील, चारुदत्त पाटील, हणमंत पवार, अजय पाटील, मनोहर पाटील, बजरंग ढेबे, मंगेश गरुड, भिमराव पाटील, विनोद तोडकर व हणमंत पवार यांचा समावेश होता.

यावेळी विज्ञान प्रबोधिनी, कराडचे अध्यक्ष शेतीमित्र अशोकराव थोरात यांनी शेतीत संशोधन, नव्या प्रयोगांची गरज आणि स्व.प्रा. पांडुरंग पुजारी यांचे विचार सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुण्या सौ.डॉ. इंदिरा घोनमोडे यांनी शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून, त्याचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऊस विकास अधिकारी पंकज पाटील यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी जमीन, बियाणे, मशागत, पाणी व खत व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच शेती विषय शालेय शिक्षणात समाविष्ट करण्याची अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात एम.एस. जाधव यांनी, कृत्रिम बुद्धिमत्ता व संशोधनवृत्तीचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ताक्षरात तयार केलेल्या हस्तलिखितांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच भेटकार्ड निर्मिती व पुष्पगुच्छ निर्मिती स्पर्धांनी कार्यक्रमात रंगत वाढविली. या कार्यक्रमास श्री मळाईदेवी पतसंस्थेचे चेअरमन अजित थोरात, मळाईदेवी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भास्करराव पाटील, खजिनदार तुळशीराम शिर्के, संचालक वसंत चव्हाण, संजय थोरात, आर.आर. पाटील, सुधाकर शिंदे, संजय तडाखे, विविध शाखांचे मुख्याध्यापक, विभागप्रमुख, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश सावंत यांनी केले. सूत्रसंचालन सौ. एस.ए. पाटील यांनी, तर आभार ए.बी. थोरात यांनी मानले.

# विट्यात किंग कोब्राला सर्पमित्रांनी दिले जीवदान

## वन्यजीव रक्षक टीमच्या सहकार्याने सुखरूप अधिवासात सोडले

**विटा / प्रतिनिधी:–**

विटा - साळशिंगे रस्त्यावरील एका घरात सापडलेल्या विषारी किंग कोब्रा नागाला सर्पमित्राने वाचवून जीवदान दिल्याची घटना घडली. विट्यात ही घटना समोर आली. येथील सर्पमित्र विवेक भिंगारदेवे यांनी सहकारी व वनविभागाच्या मदतीने जखमी किंग कोब्राला पकडून पशुवैद्यकीय दवाखान्यात नेले व त्याच्यावर उपचार करून सुखरूप अधिवासात सोडले.

दि. १२ जानेवारी रोजी सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास विटा - साळशिंगे रस्त्यावरील मंगल जगताप यांच्या घरी लोखंडी फाटकाखाली सर्प अडकल्याची माहिती येथील सामाजिक कार्यकर्ते आणि सर्पमित्र विवेक भिंगारदेवे यांना मिळाली होती. त्यांनी त्यांच्या टीमचे सहकारी ओम सुतार यांना



घटनास्थळी पाठवले. सुतार यांना त्यावेळी, फाटकाखाली अडकलेला किंग कोब्रा जातीचा नाग दिसून आला. कोब्रा गंभीर जखमी झाल्याचे दिसून आले. ही माहिती मिळताच सर्पमित्र भिंगारदेवे स्वतः घटनास्थळी गेले. त्यांनी जखमी नागाला विट्याच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात नेले.

खानापूर वनविभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर विलास पावळे यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचे अधिकृत पत्र घेऊन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश लवटे यांच्याकडे त्यांनी जखमी किंग कोब्राला नेले. विवेक भिंगारदेवे, डॉ. लवटे आणि टीमने शस्त्रक्रिया करून नागावर उपचार सुरू केले. यानंतर डॉ. लवटे यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा उपचारासाठी दवाखान्यात घेऊन येण्यास सांगितले. वन्यजीव रक्षक टीमने सलग आठवडाभर जखमी किंग कोब्रावर दवाखान्यात नेऊन उपचार केले.

सोमवारी डॉ. निलेश लवटे यांनी, नाग पूर्ण बरा झाला असल्याचे सांगितले. विवेक भिंगारदेवे, ओम सुतार, ओंकार कोळी, अख्तर शिकलगार, सोहेब शिकलगार व रेंज फ़ॉरेस्ट ऑफिसर विलास पावळे, वनरक्षक अशोक खापरकर, तौसिफ काझी यांच्या संयुक्त प्रयत्नाने किंग कोब्राला सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडले. किंग कोब्राला जीवदान दिल्यामुळे विवेक भिंगारदेवे आणि त्यांची टीम, पशुवैद्यकीय टीम व वन्य जीव रक्षक टीमचे परिसरात कौतुक होत आहे.

# महिला व बाल तस्करीविरोधात सामाजिक जागृतीची गरज

## पोलीस निरीक्षक विजय घेरडे; कापशीच्या श्री संत गाडगेबाबा महाविद्यालयात कार्यशाळा

**कापशी/प्रतिनिधी : –**

भारतातील महिला व बाल तस्करी ही गंभीर सामाजिक समस्या असून, तिच्या निर्मूलनासाठी कायद्याबरोबरच समाजाची सामूहिक जागृती अत्यावश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्यावर संस्कार करण्याची गरज आहे. सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या तरुणाईला प्रबोधनाची गरज असून, त्यांच्यामध्ये नव्या काळाशी कोणत्या पद्धतीने वर्तन करणे गरजेचे आहे हे समजावून देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शाहूवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय बाबासो घेरडे यांनी केले.

श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय कापशी मधील समाजशास्त्र विभाग, राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतिक विभाग आणि तीच व्यासपीठ आयोजित 'महिला व बाल तस्करी : एक सामाजिक समस्या' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.जे.डी. नदाफ होते.




याप्रसंगी उपस्थित सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजित पाटील यांनी शाहूवाडी तालुक्यामध्ये अल्पवयीन मुलींचे पळून जाण्याचे प्रमाण वाढले आहे, अशी खंत व्यक्त केली. यासाठी पालकांनी प्रबोधन करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यशाळेसाठी उपस्थित प्रमुख वक्ते डॉ. अविनाश वर्धन यांनी बोलताना, तस्करी म्हणजे काय सांगून, महिलांची व बालकांची तस्करी कोणत्या कारणाने होते याचे विश्लेषण केले. जिल्हा, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील तस्करी होताना फसवल्या गेलेल्या बालकाची अथवा महिलेची देवाण घेवाण कशा स्वरूपात होते, याची माहिती दिली. याचबरोबर महिलांचे लैंगिक शोषण करण्यासाठी तर बालकांचे कमी मोबदल्यात काम करून घेण्यासाठी तस्करी होते. यामध्ये उत्तर व पूर्व भारतातील राज्यात प्रमाण जास्त असल्याचे सांगितले.

याप्रसंगी दुसऱ्या प्रमुख वक्त्या ॲड. डॉ.शोभा चाळके यांनी, अल्पवयीन मुलींच्या अत्याचारामध्ये गुन्हा नोंद झालेल्या व्यक्तींवर कायद्याने कठोर शिक्षेची तरतूद केली आहे. या गुन्ह्यात समावेश असलेल्या व्यक्तींना कायद्याच्या चौकटीत मोठी किंमत मोजावी लागणार आहे. तसेच समाजानेही गिन्हेगारांना पाठीशी घालू नये, असे आव्हान केले.

यावेळी निर्भया पथकाचे सदस्य पोलीस कॉन्स्टेबल रमेश खोपकर यांनी, किशोरवयाच्या मुलांमध्ये प्रबोधन करण्याची गरज व्यक्त केली. शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर बारकाईने लक्ष देण्याचे आव्हान केले. तक्रार पेटी कार्यान्वित करून येणाऱ्या तक्रारींची दखल मुख्याध्यापकांनी घ्यावी, असे सांगितले. यावेळी निर्भया पथकाच्या सदस्या पोलीस हवालदार नेहा पाटील, पोलीस कॉन्स्टेबल अमोल भोसले उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.जे.डी. नदाफ यांनी, सध्याच्या काळातील महत्वाची समस्या या कार्यशाळेत चर्चेला आली. यावर चर्चा होऊन प्रबोधन होणे गरजेचे आहे. तसेच आमचे महाविद्यालय यासाठी सतर्क असून प्रबोधन व्हावे, यासाठी ही कार्यशाळा आयोजित केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख अग्रणी महाविद्यालय कार्यशाळा समन्वयक डॉ. गोविंद अंबी यांनी, सूत्रसंचालन डॉ. स्वप्निल बुचडे यांनी, तर आभार प्रा. अजय प्रभाकर पाटील यांनी मानले. याप्रसंगी डॉ. छाया मोळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महीपती केसरे, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, बहुसंख्येने उपस्थित होते.



# मोकाशी प्रतिष्ठानमध्ये हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : –**

संक्रांत पर्वानिमित्त दादासाहेब मोकाशी कृषी विकास प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलात २१ जानेवारी रोजी पारंपरिक हळदी-कुंकू कार्यक्रम अत्यंत मंगलमय वातावरणात उत्साहाने पार पडला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील महिला प्राध्यापक व कार्यालयीन महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमानिमित्त विद्यार्थिनींनी संपूर्ण शैक्षणिक संकुल आकर्षक व मांगल्याचे प्रतीक असणाऱ्या सुंदर रांगोळ्यांनी सजवून परिसरात उत्सवी वातावरण निर्माण केले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या स्वाती पिसाळ, माजी नगरसेविका विद्या पावसकर, प्रतिष्ठानचे जनरल सेक्रेटरी डॉ. अभिजीत दादासाहेब मोकाशी यांच्या सुविद्य पत्नी सौ. निर्मला मोकाशी, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. विश्वजित मोकाशी यांच्या सुविद्य पत्नी सौ. योगिता मोकाशी, तसेच संचालक विलास चौधरी यांच्या सुविद्य पत्नी सौ. पुष्पा चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व शिक्षणमहर्षी दादासाहेब मोकाशी यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात प्रा.एस.एन. सूर्यवंशी यांनी सर्व उपस्थितांना संक्रांतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मान्यवरांनी प्रतिष्ठानच्या सर्वांगीण विकासात महिला कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगून त्यांचे कौतुक केले. यानंतर सर्व महिला कर्मचाऱ्यांनी एकमेकींना हळदी-कुंकू व भेटवस्तू देत सौभाग्य, आरोग्य व सुख-समृद्धीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.वी. पालवे यांनी, आभार प्रा.एस.बी. मदने यांनी केले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

दादासाहेब मोकाशी कृषी विकास प्रतिष्ठानमध्ये सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. अशा उपक्रमांमधून संस्थेतील कौटुंबिक वातावरण अधिक दृढ होत असून, विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या परंपरा, संस्कृती व मूल्यांची जपणूक करण्याचे कार्य प्रभावीपणे घडत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



# महिलांनी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे:डॉ. मेधा घाडगे

**नागठाणे/प्रतिनिधी : –**

महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ मेधा घाडगे यांनी केले.

नागठाणेच्या आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या शिवाजी विद्यापीठाच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये महिलांचे आरोग्य आणि आहार या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

डॉ. घाडगे म्हणाल्या, महिलांनी शारीरिकदृष्ट्या समृद्ध असणे आवश्यक आहे. स्वत:साठी वेळ काढणे गरजेचे आहे. विशेषत: चाळीशीनंतर स्त्री रोग तज्ज्ञांकडे जाऊन आपली तपासणी करणे आवश्यक आहे. डोळे आणि केस यासोबतच इतरही अवयवांची काळजी घेत हितकर आहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

याप्रसंगी डॉ. विकास घाडगे म्हणाले, प्रसूती काळात महिलांनी आपली शारीरिक व मानसिक काळजी घेणे गरजेचे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती खाशीबाई जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

याप्रसंगी छाया पवार, आशा पवार प्रमुख उपस्थिती होत्या. तसेच उपप्राचार्य प्रा. अभय जायभाये, कार्यक्रम अधिकारी, डॉ. संदीप लोखंडे, डॉ सुनील पवार, प्रा. शौकत आतार, प्रा.एस.एस. जाधव, प्रा. प्रणिता पाटील, तसेच स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पौर्णिमा पवार हिने पाहुण्यांचा परिचय व आभार नंदिनी देशमुख हिने. तर सूत्रसंचालन किरण साळुंखे हिने केले.

# पेहचान फाउंडेशनतर्फे आयोजित कार्यशाळेस प्रतिसाद

**कराड/प्रतिनिधी : –**

समाजात प्रत्येक व्यक्तीचा मान-सन्मान अबाधित रहावा आणि लैंगिक संवेदनशीलतेविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित व्हावा, या उद्देशाने मुंबईच्या हमसफर ट्रस्ट व सातारा येथील पेहचान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कराड शहरात तीन ठिकाणी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, व अन्यत्र या कार्यशाळा उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडल्या.

येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कार्यशाळेतून व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. यामध्ये ट्रान्सजेंडरसह विविध तज्ज्ञ वक्त्यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात प्रा. एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये जेंडर सेन्सिटिव्हिटीबाबत वाढलेली जागरूकता अधोरेखित केली. एलजीबीटीक्यू समुदायाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर होणे गरजेचे असून, या विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देऊन त्यांची ऊर्जा राष्ट्रनिर्मितीसाठी वापरली पाहिजे, असे ते म्हणाले. हा समुदाय नैसर्गिक असून समाजाने त्यांना सर्व क्षेत्रांत स्वीकारल्यास ते मुख्य प्रवाहात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेत वैज्ञानिक दृष्टिकोनातून लिंगभेद, लैंगिक ओळख, ट्रान्सजेंडर व एलजीबीटीक्यू समुदायाविषयीचे गैरसमज दूर करण्यावर भर देण्यात आला. हमसफर ट्रस्टच्या निलोफर मस्के व सुमी एम. के. यांनी समुदायाची ओळख करून देत त्यांच्या सामाजिक व कायदेशीर संघर्षांवर प्रकाश टाकला.



यावेळी डॉ. एस. के. पाटील, प्रा. देशपांडे आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. कृष्णा आळसुंदकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित व समावेशक वातावरणाचे महत्त्व विशद केले. पेहचान फाउंडेशनच्या याशी पाटील, अमोल साळुंखे तसेच महाविद्यालयाच्या जिमखान्याने कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. प्रश्नोत्तरांच्या सत्रात विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे समाधान करण्यात आले.

व्यावसायिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठीही लैंगिक संवेदनशीलतेवर आधारित विशेष सत्रे घेण्यात आली. व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. तृतीयपंथीयांचा स्वीकार केलेल्या पालकांशी झालेल्या संवादातून इतर पालकांना आपल्या पाल्याला नाकारू नका, तर प्रेमाने स्वीकारा, असे आवाहन करण्यात आले.

# कॅन्सरविषयी जनजागृतीसाठी साताऱ्यात जीपीथॉन २०२६'चे आयोजन

## धन्वंतरी पतसंस्था व सातारा जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचा उपक्रम

**सातारा/प्रतिनिधी:–**

सध्या साथीच्या आजाराप्रमाणे समाजात कॅन्सरचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या जीवघेण्या आजाराविषयी शास्त्रोक्त माहितीपेक्षा भीती व गैरसमज अधिक पसरलेले आहेत. हे गैरसमज दूर करून सर्वसामान्य नागरिकांना योग्य आणि शास्त्रीय माहिती मिळावी, या उद्देशाने धन्वंतरी पतसंस्था जीपीथॉन २०२६ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या मॅरेथॉनच्या माध्यमातून कॅन्सरपासून बचावासाठी घ्यावयाची काळजी, वेळेत निदान होण्यासाठी आवश्यक तपासण्या तसेच उपचारपद्धती याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत कमानी हौदाजवळील धन्वंतरी पतसंस्थेच्या धन्वंतरी हॉलमध्ये महिलांसाठी गर्भाशयाची पॅप स्मिअर (झरि डिशरी) चाचणी व स्तन तपासणी (ईशरींीं डलीशशपळपस) मोफत करण्यात येणार आहे. या तपासणीचा लाभ ३० ते ६५ वयोगटातील महिला घेऊ शकतात. इच्छुक महिलांनी ८८५६०३९०४० या व्हॉट्सप क्रमांकावर स्वतःच्या व्हॉट्सपवरून नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



'रन फॉर कॅन्सर अवेरनेस' या संकल्पनेतून रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी साताऱ्यात शाहू स्टेडियम ते यवतेश्वर घाट आणि पुन्हा शाहू स्टेडियम या मार्गावर ३ किमी व १० किमी अंतराच्या 'धन्वंतरी पतसंस्था जीपीथॉन २०२६' मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अत्यंत दर्जेदार पद्धतीने होणार असल्याची माहिती स्पर्धेचे अध्यक्ष डॉ. नितीन लेंभे आणि रेस डायरेक्टर डॉ. दयानंद घाडगे यांनी दिली.

या मॅरेथॉनसाठी सातारा, पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर, बेळगाव आणि बारामती आदी ठिकाणांहून धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमास सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाधिकारी संतोष पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, सातारा नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि सातारा हिल मॅरेथॉनचे संस्थापक डॉ. संदीप काटे यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.ही मॅरेथॉन यशस्वी करण्यासाठी जीपी असोसिएशन सातारा संस्थापक डॉ. रविंद्र भोसले, डॉ. कांत फडतरे, डॉ. अरविंद काळे, डॉ. शिरीष भोईटे, आयर्नमॅन डॉ. सुधीर पवार, डॉ. जयदीप चव्हाण, डॉ. जवाहर शहा, डॉ. अभय टोणपे, अध्यक्ष डॉ. राजेंद्र सकुंडे, सचिव डॉ. किशोर शिंदे यांच्यासह धन्वंतरी पतसंस्था जीपीथॉन २०२६ आणि जीपी असोसिएशन साताराचे सर्व पदाधिकारी व संचालक परिश्रम घेत आहेत.

या स्पर्धेसाठी नावनोंदणी करण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२६ आहे . तसेच दिनांक २४ जानेवारी रोजी सकाळी दहा ते दोन या दरम्यान धन्वंतरी पतसंस्था परिसरातील धन्वंतरी हॉल येथे कॅन्सर जनजागृती तपासणी शिबीर अंतर्गत महिलांच्या गर्भाशयाची चाचणी व स्तनांची तपासणी मोफत करण्यात येणार आहे .यासाठी ३० ते ६५ वयोगटातील महिला या तपासणीचा लाभ घेऊ शकतात असे संयोजकांनी कळवले आहे

# बोरगाव वारनानगर येथून महिला बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुक्यातील मौजे वारणानगर येथून दि १८ रोजी राणी बाबुराव पाटील (वय ४८ वर्ष) या राहत्या घरातून कोणास काही न सांगता निघून गेले आहेत त्यांचा शोध घेतला असता त्या मिळून आल्या नसल्याने त्यांचे पती बाबुराव संपत पाटील (वय ६० वर्ष) यांनी बोरगाव पोलीस ठाण्यात मिसिंग ची फिर्याद दाखल केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार चव्हाण करत असल्याची माहिती बोरगाव पोलिसांनी दिली आहे.

# डंपरने दुचाकी चालकास..

पान १ वरुन

घटनास्थळी अपघाताचे दृश्य बघून अनेकांचे मन हेलावून गेले. तर शिंदे यांच्या डोक्यासह चेहऱ्यावर जखमा झाल्याने अपघातस्थळी दृश्य गंभीर दिसत होते. दुचाकीच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला होता.

या अपघातानंतर विटा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर घटनेचा पंचनामा उशीरा करित होते. हा अपघात कसा झाला, याची माहिती मिळू शकली नाही. मात्र विटा – मायणी रोडवरील रस्त्यावर पडलेले खड्डे, व रस्त्यावर लावलेली वाहने यामुळे अपघात झाला असावा, अशी चर्चा घटनास्थळी नागरिकांतून होत होती. संबंधित नगरपालिका प्रशासकाने रस्त्यावरील अतिक्रमण काढून वाहतुकीसाठी पार्किंग तसेच दुचाकी पार्किंग याची सोय करणे गरजेचे आहे अशी ही चर्चा घटनास्थळी होत होती. मात्र डंपरच्या धडकेत पोस्टमन महादेव शिंदे यांचा अपघातात मृत्यू झाला. आता तरी विटा नगरपालिका प्रशासक या अतिक्रमण कडे लक्ष देणार का ? आणखीन काय दुर्घटना घडण्याची वाट बघणार ? विटा नगरपालिका प्रशासकाने रस्त्यावर ठरणारे अडथळे दूर करावे व रस्त्याचा मार्ग मोकळा करावा अशी मागणी महिला वर्ग व विटेकर नागरिक यांनी विटा नगरपालिका प्रशासकाकडे केली आहे. पोलिसांना मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न डंपर चालकाने केल्याने मोटरसायकल वरील चालकाचा ताबा सुटला आणि अपघात झाल्याचे दिसत आहे.

# खा.एस.डी. पाटील आंतरराज्यस्तरीय सुवर्ण चषक हॉकी स्पर्धेस आज सुरुवात

## संजय पाटील; राज्यासह परराज्यातील १२ संघांचा समावेश

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे संस्थापक खा.एस.डी. पाटील यांची ११५ व्या जयंती निमित्त ३९ व्या आंतरराज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचा शुभारंभ आज दि. २३ रोजी सकाळी ९ वाजता उरूण – ईश्वरपूर येथे वाळवा तालुका शिक्षण संस्थेच्या प्रांगणात होणार आहे, अशी माहिती सामना समितीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी दिली.

सदर स्पर्धेची माहिती देताना संजय पाटील म्हणाले, या स्पर्धेत यजमान एस.डी. पाटील चॅरिटेबल ट्रस्ट ईश्वरपूर, हनुमान ब्लेसिंग स्पोर्ट्स क्लब गदग, यगस्टार स्पोर्ट्स क्लब हुबळी, एस.आर.पी.एफ. पुणे, ॲक्झीलेटर्स हॉकी अकॅडमी कोचीन केरळा, पोस्ट ऑफिस इंडिया मुंबई, वासू बेल्लारी स्पोर्ट्स क्लब हुबळी, कोल्हापुर पोलिस कोल्हापुर, मुंबई पोलिस मुंबई, महाराष्ट्र क्रीडा मंडळ कोल्हापुर, फलटण जिमखाना फलटण हे संघ सहभागी होणार आहेत. चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धा प्रथम साखळी पद्धत व नंतर बाद पध्दतीने खेळवल्या जाणार आहेत. प्रथम येणाऱ्या संघास ६१ हजार रुपये रोख व सुवर्ण चषक, तसेच द्वितीय क्रमांकास ४१ हजार रुपये रोख रक्कम व रौप्य चषक, तसेच प्रत्येक सामन्यातील उत्कृष्ठ खेळाडूस सामनावीर पुरस्कार दिला जातो. बक्षीस वितरण समारंभ दि. २६ रोजी दुपारी ४ वाजता उरूण ईश्वरपूरचे उपनगराध्यक्ष खंडेराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.




स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सामना समितीचे अध्यक्ष संजय पाटील, संजय चरापले, ताहिर खाटीक, संजय चव्हाण, संजय कबरे, राजेंद्र खंकाळे, जयवंत जाधव, नदीम पटवेकर, विजय सावंत, प्रताप पाटील, सुहास पाटील, सत्वशील पाटील व एस.डी. पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व आजी-माजी खेळाडू कार्यरत आहेत.

# सुमन कदम यांचे निधन

**सातारा/प्रतिनिधी : –**



गॉगवे, ता. महाबळेश्वर येथील तालुका भारतीय बौध्द महासभा शाखा क्रमांक ४ चे बबन भैरु कदम यांच्या पत्नी कालकथित सुमल बबन कदम यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यसंकार आंबेडकरनगर गोगवे याठिकाणी संपन्न झाला. त्यावेळी अनेकांनी आदरांजली अर्पण केली.

# आदर्श माध्यमिक विद्यामंदिर येथे कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत कराटेचे प्रशिक्षण उत्साहात संपन्न

**विटा/ प्रतिनिधी:–**

आमचे लोकनेते माननीय हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, विटा संचलित आदर्श माध्यमिक विद्यामंदिर विटा भवानीनगर येथे कन्या सबलीकरण अंतर्गत कराटे प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक पी. टी. पाटील, केंद्रप्रमुख दिलीपकुमार सानप, मुख्याध्यापक सुभाष धनवडे, सर्व शिक्षक, विद्यार्थी व कराटे प्रशिक्षक अनमोल बाबर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या २ ऑगस्ट २०२५ शासननिर्णय नुसार, राज्यातील ५०० पेक्षा जास्त मुलींची संख्या असणाऱ्या शाळांमध्ये कन्या सबलीकरण कार्यक्रम राबवण्याच्या निर्णयानुसार विद्यालयामध्ये अनमोल बाबर कराटे प्रशिक्षक यांची विद्यालयाने कराटे प्रशिक्षक म्हणून निवड केली आहे.




त्यांच्या मार्गदर्शनाखाली दर शनिवार स. ८ ते ९ या वेळेमध्ये शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी विद्यार्थिनींना कराटे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबवला जात आहे.

शासनाच्या कन्या सबलीकरण उपक्रमाचा मुख्य उद्देश मुलींना स्वसंरक्षणातून आत्मनिर्भर बनवणे तसेच मुलींमध्ये आत्मविश्वास,स्वसंरक्षण कौशल्य व शारीरिक तंदुरुस्ती विकसित करून मुलींना कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सुसज्ज करणे, मुलींमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे,मुली संकटाच्या आणि असुरक्षिततेच्या वेळी स्वतःचे संरक्षण स्वतःच करू शकतील व अन्याय करणाऱ्या विरुद्ध या मुली न घाबरता व न डगमगता स्वसंरक्षणार्थ खंबीरपणे एकमेकांच्या सोबतीने उभ्या राहतील हा आहे.

आदर्श माध्यमिक विद्यामंदिर मधील कराटे प्रशिक्षक बाबर सर नेहमीच मुलींना कराटेचे महत्त्व समजावून सांगून त्यांना अनेक छोट्या छोट्या कौशल्यांची माहिती देऊन त्यांच्याकडून प्रत्यक्ष कृती करून घेत असतात. त्यामुळे ऑगस्ट महिन्यापासून चालू असलेल्या या उपक्रमांतर्गत मुलींमध्ये खूपच आत्मविश्वास वाढलेला दिसून आला आहे. या उपक्रमाची तपासणी करण्यासाठी केंद्रप्रमुख सानप सर उपस्थित होते. त्यांनीही मुलींची प्रात्यक्षिके पाहून शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. कन्या सबलीकरण या उपक्रमासाठी संस्थेचे कार्यकारी संचालक पी. टी. पाटील, शाळेचे मुख्याध्यापक एस. एम. धनवडे व सर्व शिक्षक उपस्थित होते.


# आज का अंदाज

**शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| १ - ४ - ७ - ८ | २ - ५ - ६ - ७ |
| १००-१६७-१७९-१८९ | २३७-१५९-१६९-११५ |
| २९०-३५६-३५९-३७८ | ५७०-२६७-२४०-४४९ |
| ३८०-४००-२५०-२६० | ६६०-३४८-३३०-२२३ |
| जोडी | जोडी |
| १० -४० - ७३ - ८३ | २४ -५० - ६८ - ७८ |
| १६ -४६ - ७५ - ८५ | २० -५४ - ६९ - ७९ |
| १२ -४२ - ७९ - ८९ | २१ -५१ - ६३ - ७३ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.२३-२४ जानेवारी

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्व बाजार साठी | २५ | ३५ | ६० | ९० |
| | २४ | ३४ | ९८ | ९८ |
| | २७ | ३७ | ६१ | ९१ |
| | १३८ | ३४६ | १७८ | ९०० |
| | ३४५ | १६६ | ३५८ | ४५० |
| | २०० | ६८९ | २७७ | २८९ |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**

शुक्रवार २३ जानेवारी २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल २-३-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 129<br>456<br>110 | 2 - 6 | 123<br>367<br>556 | 24-86-03-95-67 |

**कल्याणम**

उदय-अस्त | सिंगल ०-४-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 190<br>460<br>280 | 0 - 5 | 140<br>230<br>780 | 01-25-43-79-58 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 130<br>149<br>112 | 4 - 2 | 138<br>246<br>228 | 40-62-71-39-25 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
|---|---|
| १८९ २८८ ३७० **८** ३७७ १६० २५० **७** ४७९ ३८९ २९९ **०** | १९९ २८९ ३७९ **९** ४८० ५७० ६६० **२** ५०० १४० २३० **५** |

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लेज डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट |
|---|---|
| २४६ ३९० १२९ **२** २३८ ६७० ३०० **३** ६९९ २६६ ४४६ **४** | ४७० ५६० ३८० **१** १९० २८० ३७० **०** १२४ २७८ ४४९ **७** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट |
|---|---|
| ८९० ३४० ५६६ **७** ६९० ७८० ५०० **५** २३९ ५९० ६८० **४** | १३९ २३८ ३३७ **३** १३८ ३४५ ६७९ **२** २२६ ४८८ १२७ **०** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट |
|---|---|
| १५७ ४९० २२९ **३** १५० २६८ ७९० **६** १२६ ३६० ५६८ **९** | ७८९ ११२ ४०० **४** २५८ ३४९ ११४ **६** १२५ २७९ ३५० **८** |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ - ९ - ० - १

७

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १९-०१-२०२६ २०-०१-२०२६ २१-०१-२०२६

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# अफगाणिस्तानमधून आलेला बेदाणा जप्त करा

## बेदाणा, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; परदेशातून येणाऱ्या फळांवर १०० टक्के कर लावा

**सांगली / प्रतिनिधी:–**

अफगाणिस्तानमधून आयात केलेला निकृष्ट दर्जाचा बेदाणा ज्या व्यापाऱ्यांनी विक्रीस ठेवला आहे, तो जप्त करावा तसेच परदेशातून आयात होणाऱ्या सर्वच फळांवर शंभर टक्के आयात कर आकारावा यासह अन्य मागण्यांसाठी बेदाणा व द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.



विश्रामबाग चौकातील क्रांतीसिंह नाना पाटील पुतळ्यापासून मोर्चास प्रारंभ झाला, तेथून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, चीनचा निकृष्ट दर्जाचा बेदाणा अफगाणिस्तानमार्गे आयात कर चुकवून सांगलीत येत आहे. आयात कर आणि शुल्क चुकवून बेदाणे मोठ्या प्रमाणात भारतात येत असल्याने कर चोरीमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. सदर आयात केलेला निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यावर प्रक्रिया करुन आपल्याकडील चांगल्या दर्जाच्या बेदाण्यामध्ये मिक्स करुन त्याची

विक्री केली जात आहे. हा बेदाणा आरोग्यास घातक आहे. त्यामुळे अफगाणिस्तानमधून आयात केलेला निकृष्ट दर्जाचा बेदाणा जप्त करावा, अफगाणिस्ताण, चीन व इतर देशातून भारतात आयात होणाऱ्या बेदाण्यावर शंभर टक्के आयात कर लावावा. द्राक्ष व बेदाणा निर्यातीपासून परकीय चलन मिळत असल्याने सांगली जिल्ह्यात इनलैंड कंटेनर पोर्टल (आयसीडी) व्हावा. यामुळे सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हधातील निर्यात मोठ्या प्रमाणात वाढेल. एनएचबीच्या अनुदान योजनेत एक एकर क्षेत्रापासूनच्या पुढच्या सर्व द्राक्ष बागांचा समावेश करावा व अनुदान रक्कम वाढवावी, बेकायदेशीररित्या अफगाणिस्तानमार्गे चीनचा बेदाणा ज्या व्यापाऱ्यांनी आयात केला आहे, त्यांच्यावर देशाचा महसूल बुडवल्याप्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. भारत सरकारने बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करावा. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांकडून द्राक्ष शेतमाल घेऊन तो द्राक्ष व्यापारी, निर्यातदार पैसे चुडकवितात त्यांच्यावर मोक्कांतर्गत कारवाई करावी. सर्व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, तसेच द्राक्ष आणि डाळिंब या पिकांच्या कर्जमाफीसाठी विशेष धोरण आखावे, परदेशातून आयात होणाऱ्या सर्व बेदाण्याची माहिती शासनाच्या, बाजार समित्या तसेच संघाच्या पोर्टलवर उपलब्ध करावी आदी मागण्या याप्रसंगी करण्यात आल्या.

# अजंठा चौक येथे फळांच्या दुकानाला भीषण आग

## दोन लाखांचे नुकसान ; अज्ञाताविरुध्द तक्रार दाखल

**सातारा / प्रतिनिधी:–**

अजंठा चौक, सातारा येथील फळांच्या दुकानास आग लागली. ही घटना दि. २१ जानेवारी रोजी रात्री दहा वाजता घडली. या आगीमध्ये सुमारे दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीचे कारण समजू शकले नसले तरी अज्ञाताविरुध्द याबाबत आयुब फकीर महंमद बागवान यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

याबाबत घटनास्थळ व पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजंठा चौक येथे आयुब फकीर महंमद बागवान वय ५५ रा. संभाजीनगर ता. सातारा हे गेल्या दहा वर्षापासून फळांचा व्यवसाय करत आहेत. या व्यवसायात त्यांची तीन मुलेही मदत करत असतात. सुर्यनारायण उपवास विचारात घेवून फळांची मोठ्या प्रमाणात खरेदी करुन दुकानात ठेवले होते. बुधवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान दुकान बंद करुन घरी गेले. तोपर्यंत काही वेळातच या दुकानाला भीषण आग लागल्याचे समजले. पुन्हा ते फळांच्या दुकानाच्या ठिकाणी येईपर्यंत संपूर्ण दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. दरम्यान, स्थानिकांनी नजिकच्या ठिकाणाहून एक पाण्याचा टँकर आणून आग विझवण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याचवेळी अग्निशामन दलाची गाडीही आल्यामुळे ही आग तात्काळ विझवण्यात आली. या आगीत गल्ल्यातील दीड ते दोन हजार रुपये व फळांचे गाडे आगीत भस्मसात झाले आहेत. याबाबतचा अधिक तपास सातारा शहर पोलीस करत आहेत.

# तुळसण येथे पशुवैद्यकीय दवाखान्याची ग्रामस्थांची मागणी

**कोळे/प्रतिनिधी : –**

तुळसण, ता. कराड गावातील विठोबाचीवाडी व पाचुपतेवाडी परिसरात सध्या अडीच हजारांहून अधिक जनावरे असूनही येथे अद्याप सरकारी पशुवैद्यकीय दवाखाना उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तुळसण येथे पशुवैद्यकीय दवाखाना दवाखाना सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

परिसरातील जनावरे आजारी पडल्यास, प्रसूती, अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत उपचारासाठी ओंड अथवा कराड येथे जावे लागते. वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेकदा पशुधनाचे नुकसान होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच खाजगी पशुवैद्यकांना बोलवावे लागल्याने आर्थिक खर्चात मोठी वाढ होत आहे. लसीकरण, कृत्रिम रेतन, गरोदर तपासणी यांसारख्या अत्यावश्यक पशुवैद्यकीय सेवांसाठीही पशुपालकांना खाजगी व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे. याचा थेट परिणाम पशुपालकांच्या आर्थिक स्थितीवर होत असून, दूध उत्पादनातही घट होत आहे.

याबाबत शेतकरी अमोल वीर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, तुळसण परिसरात अडीच हजारांपेक्षा अधिक जनावरे आहेत. जनावर आजारी पडल्यास ओंड किंवा कराड येथे न्यावे लागते. खाजगी डॉक्टरांना बोलविल्यास मोठा खर्च होतो. शासनाने याचा गांभीर्याने विचार करून तुळसण येथे कायमस्वरूपी सरकारी पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करावा.

तुळसण येथे सरकारी पशुवैद्यकीय दवाखाना सुरू झाल्यास पशुधनाच्या आरोग्यात सुधारणा होऊन दूधउत्पादनात वाढ होईल. यामुळे शेतकरी व पशुपालकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा परिसरातील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाचा आढावा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :–**




राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी बांधकाम विभागाकडील जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या बैठकीत श्री अंबाबाई विकास आराखडा, श्री जोतीबा विकास आराखडा, खिद्रापूर, सारथी इमारत, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत शेंडा पार्क अशा विविध बांधकाम सुरू असलेल्या कामकाजाबाबत माहिती घेतली व आवश्यक सूचना प्रशासनास केल्या. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्रशासक तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य अभियंता रहाणे, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग तुषार बुरुड, कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, पुरातत्त्व विभागाचे विलास वाहने यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

शासनाकडून यापूर्वी निधी मंजूर असलेल्या व सद्यस्थितीत कामे सुरू असलेल्या कामकाजाबाबत पुरातत्त्व व बांधकाम विभागाने सादरीकरणातून माहिती दिली. यावेळी मनीषा म्हैसकर यांनी उपस्थितांना सूचना केल्या. त्या म्हणाल्या, सर्व मंजूर कामे विहित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करावीत. प्रत्येक कामांचे विविध टप्प्यांमध्ये विभागणी करून आराखडे सादर करावेत. प्राधान्यक्रम ठरवून आवश्यक कामे हाती घ्या, त्यानंतर निधी प्राप्त होईल तशी पुढील कामे मंजुरीसाठी घ्या.

मंदिर विकास आराखड्यांची अंमलबजावणी करताना भूसंपादनासह त्यांच्या पुनर्वसनाला प्राधान्य द्या. वाढलेले भाव विचारात घेऊन नागरिकांना पुनर्वसनाचे पर्याय दिल्यास त्यांनाही त्याठिकाणी अडचणी राहणार नाहीत. लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी एकत्रित प्राधान्यक्रम ठरवून कामांचे क्रम निश्चित करावेत. प्रथम आवश्यक कामांना निधी खर्च करावा. कोल्हापूर जिल्हा ऐतिहासिक असून येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यांच्यासह स्थानिकांना सोयी–सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रथम विचार व्हावा. बैठकीत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सुरू असलेल्या कामांची माहिती अतिरिक्त मुख्य सचिवांना दिली. स्वागत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची प्रतिकृती व पुस्तिका देऊन करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी केले. बैठकीनंतर त्यांनी श्री अंबाबाई व श्री जोतिबा मंदिरातील कामांची पाहणी केली. त्यासोबतच त्यांनी नव्याने सुरू झालेल्या कोल्हापूर सर्किट बेंच इमारतीचीही पाहणी केली.

# स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी अधिकराव चव्हाण

**पाटण/प्रकाश कांबळे:–**

स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी अधिकराव चव्हाण यांची एक मताने निवड करण्यात आली संघटनेचे संस्थापक, राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड यांनी नुकतीच घोषणा केली.



बोरगाव तालुका सातारा येथील कुबेर छाया मल्टीपर्पस हॉल मध्ये स्वाभिमानी नाभिक संघटनेच्या पदाधिकारी निवडीची बैठक नुकतीच पार पडली यामध्ये राज्य कार्यकारणी, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम संपन्न झाला. संघटनेचे संस्थापक, राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली, राज्य कार्यकारणी व पश्चिम महाराष्ट्र, कार्यकारिणीच्या निवडी पार पडल्या. यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अधिकराव चव्हाण, राज्य उपाध्यक्ष प्रदीपराव काशीद, राज्य खजिनदार शिवाजी खामकर, राज्य संपर्कप्रमुख विजय काशीद, राज्य प्रसिद्धीप्रमुख नारायण यादव, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नवनाथ काशीद ,पश्चिम महाराष्ट्र खजिनदार दत्तात्रय तावरे ,पश्चिम महाराष्ट्र संघटक, सुनील जाधव, पश्चिम महाराष्ट्र प्रवक्ते कृष्ण जाधव, वरील सर्वांच्या निवड पुढील पाच वर्षा करण्यात केले आहेत.

श्री चव्हाण यांनी यापूर्वी संघटनेच्या तालुका अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, या पदावर काम करत असताना संघटनात्मक बांधणीसाठी केलेल्या प्रामाणिक कार्याची व निष्ठेचे दखल घेऊन तसेच पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली असल्याची राज्याध्यक्ष गायकवाड यांनी सांगितले.

यावेळी अधिकराव चव्हाण म्हणाले स्वाभिमानी नाभिक संघटना सर्वसामान्य नाभिक समाजाच्या उन्नतीसाठी काम करणार आहे. समाजातील सामान्य लोकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने नाभिक समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी कायमच प्रयत्नशील राहणार आहे आत्ता पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून काम करत असताना पूर्वीप्रमाणेच ग्रामीण भागाला केंद्रबिंदू मानून संघटनात्मक बांधणे तसेच समाजातील प्रश्न सोडून व्यवसायाच्या व समाजातील सर्व घटकांना सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील राहण्यास आपण कटिबद्ध असल्याचे तसेच आपण संघटनेमध्ये विविध पदावर काम करत असताना मिळालेला अनुभव याचा समाज उन्नतीसाठी उपयोगात आणून तसेच संघटनेची ध्येय धोरण विचारधारा यांच्याशी बांधील राहून आपण संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन समन्वयाने काम करणार असल्याची ग्वाही देत ग्रामीण भागात संघटना मजबुतीसाठी काम करणार असून स्वाभिमानी नाभिक संघटना ही पक्ष विरहित काम करणारी आहे संघटनेचे ध्येय धोरणाचे पालन करून समाजाच्या न्याय हक्कासाठी, समाज प्रगतीसाठी, नाभिक समाजातील युवकांना कौशल्य विकासासाठी संघटनेच्या माध्यमातून काम करणार असून समाज हितासाठी आपण कायम बांधील राहून काम करू असे आश्वासन यावेळी अधिकराव चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले.

यावेळी राज्य कार्यकारणी, पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी, जिल्हा कार्यकारणी तालुका कार्यकारणी पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. त्यावेळी मीटिंग साठी उपस्थित असणारे पदाधिकारी संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष शंकरराव गायकवाड, राज्य सरचिटणीस मंगेशराव काशीद, राज्य महिला सदस्या अनितताई काशीद, रामभाऊ पवार, सातारा तालुका अध्यक्ष जगन्नाथ पवार, पाटण तालुकाध्यक्ष बाबुराव पवार, कराड दक्षिण तालुकाध्यक्ष अर्जुन सूर्यवंशी, कराड उत्तर तालुका अध्यक्ष गणेश कदम, जिवाजी महाले समितीचे सदस्य संग्राम माने, विष्णू सपकाळ, दाजी सुर्वे, संघटनेचे सर्व पदाधिकारी जिल्ह्यातील सर्व नाभिक समाज बांधव उपस्थित होते प्रस्ताविक राज्य सरचिटणीस मंगेश काशीद यांनी केले आभार रामभाऊ पवार यांनी मानले.

# करंजे नाक्यावर जुगार अड्ड्यावर छापा

**सातारा/प्रतिनिधी:–**

शाहूपुरी पोलिसांनी दि. २० रोजी करंजे नाका येथे प्रमिला मंगल कार्यालयाच्या पाठीमागील रस्त्यालगत असलेल्या ओढ्याजवळ जुगाराच्या अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत ९४० रुपयांची रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले.याप्रकरणी प्रकाश तात्याबा इंगळे (वय ६२, रा. पिंपळगाव, शेखर राजाराम परदेशी (वय ५६, रा. पावर हाऊस, कोरेगाव) व नितीन अनिल कुराडे (रा. एकता कॉलनी, करंजे) यांच्याविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# फलटणमध्ये पहिल्या प्रियकर व नवऱ्याच्या..

पान १ वरुन

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फलटण तालुक्यातील मौजे सोमंथळी येथील सतीश ऊर्फ आप्पा दडस याचे १४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी दोनच्या सुमारास त्याच्यासोबत काम करणाऱ्या लखन बंडू बुधवाले व सतीश तुकाराम माने यांच्यासोबत भांडण झाले होते. या वादात संबंधित महिलेच्या नवऱ्याने सतीशच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले.

यानंतर उपचारासाठी दवाखान्यात नेतो असे सांगून त्याला विडणी येथील मांगोबामाळ परिसरात आणण्यात आले. मात्र, पुढे त्याला फलटण तालुक्यातील धुळदेव गावाच्या हद्दीतील भिवरकर वाडी येथे नेऊन पुन्हा डोक्यात दगड घालून निर्घृण मारहाण करण्यात आली.

या संपूर्ण कृत्यात लखन बंडू बुधवाले, सतीश तुकाराम माने व रेश्मा लखन बुधवाले यांचा थेट सहभाग असल्याचे तपासात उघड झाले आहे. खून केल्यानंतर आरोपींनी पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने सतीश दडस याचा मृतदेह लाकडे कापण्याच्या मशीनने तुकडे केला. मुंडके, खांद्यापासून हात आणि गुडघ्यापासून पाय वेगळे करून हात, मुंडके व पाय निरा नदीत फेकून देण्यात आले, तर उर्वरित मृतदेह फलटण तालुक्यातील साठे गावातील एका शेतात गाळात पुरून ठेवण्यात आला, अशी कबुली संशयितांनी दिल्याचे सांगितले जात आहे. या संतापजनक आणि अंगावर शहारे आणणाऱ्या गुन्ह्याचा तपास फलटण ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, या प्रकरणामुळे संपूर्ण फलटण तालुका हादरून गेला आहे.

# सुरुंग लावून मोठे ब्लास्टिंग केले जात असल्यामुळे घराना तडे जाण्याचे प्रकार

## सुरत चेन्नई महामार्ग कंपनीचे कारस्थान

**अक्कलकोट/महेश गायकवाड:–**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरालगत बासलेगाव रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालय जवळ सूरत ते चेन्नई महामार्गाचे काम सुरू आहे. रस्ता बनविण्यासाठी संबंधित कंपनीकडून नियमबाह्य अवैधरित्या बोर गाडीच्या सहाय्याने सुरुंग लावून मोठ मोठे ब्लास्टींग केले जात आहे. या वाढत्या ब्लास्टींगमुळे येथील अनेक घरांना मोठे तडे गेले आहेत, तर अनेक घरांची पडझड होण्याची शक्यता आहे. आणि अनेक कुटुंबांच्या बोअरवेल मधील पाण्याची पातळी कमी झाली आहे.

> गेल्या वर्षभरापासून सूरत ते चेन्नई रस्ता कामकाज सुरू असून मात्र एक – दोन महिन्यांपासून दिवस व रात्र वसाहत परिसरात अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. याकडे तहसील प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. तरी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास पायबंद घालण्यासाठी सूचना द्यावी, अन्यथा या परिसरातील श्री वटवृक्ष गणेश मंडळाच्या वतीने नागरिकांनी आंदोलन करणार असल्याचे सांगितले.



गेल्या अनेक दिवसांपासून ब्लास्टींग सुरू असताना, अनेक मोटारसायकलस्वार बासलेगाव कडे जात असताना किंवा अक्कलकोट कडे येत असताना त्यांच्या बाजूलाच ५ ते १० किलोचा भला मोठा दगड येऊन पडला. सुदैवाने तो मोटारसायकलस्वार सहपत्नीक थोडक्यात बचावले.

गेल्या दोन महिन्यांपासून ब्लास्टींगचे काम सुरू असून, कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील वसाहत मधील नागरिक व महिलांसह वयोवृद्ध व्यक्ती आणि चिमुकली मुले जीव मुठीत घेऊन जीवन जगत आहेत. दररोज ब्लास्टींग सुरु असताना सकाळी पासून ते संध्याकाळी पर्यंत वसाहत लगत व बासलेगाव रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड पडले. संबंधित रस्ता ठेकेदारांच्या सहकारी इंजिनिअर व कामगारांनी संगनमताने हे अवैध ब्लास्टींग मर्यादा पेक्षा जास्त उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

तर परिसरातील मंगल कार्यालयाचे संचालक उरुजपाशा पिरजादे, नागराज कुंभार, प्रशांत गुरव, सुनील गोरे, सिध्दाराम पाटील, इनायत शेख, रमेश शिंदे, दिगंबर साळुंखे, गुरप्पा कुंभार, सुनील आळंद, अविनाश कोरे, विजयकुमार मलंग, विकास जकापुरे, संगमेश्वर स्वामी, सचिन डिग्गे, शशिकांत कुंभार, करेप्पा रोळ्ळी, अलका दसले, उज्वला फडतरे, विजयालक्ष्मी कुंभार यांच्या घरांना तडे गेले आहेत. सूरत ते चेन्नई सुपर रस्ता काम करणाऱ्या कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी येथील वसाहत मधील नागरिक व महिलांनी अनेकवेळा कंपनीसह शासन लोकप्रतिनिधींना तोंडी सांगितले आहे, आता निवेदने देण्याचा तयारीत आहेत. विशेष म्हणजे या अवैध ब्लास्टींग उडविण्याचे बाबतीत पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांनी सुद्धा या वसाहत मधील नागरिकांच्या तोंडी तक्रारीची दखल घेऊन ठेकेदारांच्या मुनिमास सूचना दिल्या आहेत. तरी सुद्धा त्या सूचना ची पायमल्ली केली जात आहे. म्हणून तहसीलदार व लोकप्रतिनिधी यांनी संबंधित ठेकेदारास ब्लास्टींग उडविण्याऐवजी पर्यायी मार्ग निवडण्याची सूचना द्यावी, अशी वाढती मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

> माझी शेती सूरत ते चेन्नई महामार्गाच्या दोन्ही बाजूला आहे. या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग घेत असल्याने धुळीमुळे पीकांचे नुकसान होत आहे. तसेच गेल्या वर्षभरापासून दोन एकर शेतजमीन मध्ये पावसाचे पाणी थांबले आहे. यामुळे सदरची दोन एकर शेतजमीन नापीक झाले आहे. यामुळे सुमारे दोन लाख रुपये किंमतीची नुकसान झाले आहे. सदर नुकसान कंपनीने भरून द्यावे, याबाबत कंपनीकडे वारंवार मागणी केली आहे. मात्र माझ्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. नुकसान भरपाई दिली नाही तर याबाबत निवेदन देऊन उपोषणासाठी बसणार आहे.
>
> अहमदपाशा पिरजादे
> शेतकरी, नागनहळ्ळी.

# विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्नशील राहावे:जगदीश धस

**कोळे/प्रतिनिधी : –**

आजच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सक्रिय प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन मराठी चित्रपट व नाट्य अभिनेते, तसेच प्रसिद्ध पक्षी अभ्यासक जगदीश धस यांनी केले.



कोळे, ता. कराड येथील श्री संत घाडगेनाथ हायस्कूलमध्ये आयोजित स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डाळे उपस्थित होते.

धसे म्हणाले, विद्यार्थ्यांनी पशुपक्षी तसेच झाडांची काळजी घेतली पाहिजे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व ओळखून संवर्धन केले, तरच पर्यावरणाचा समतोल टिकून राहील. आज पर्यावरणाचा ऱ्हास ही गंभीर समस्या असून, यासाठी भावी पिढीने सजग राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी विविध पक्षी, प्राणी, तसेच राजकीय नेते आणि मराठी–हिंदी चित्रपटांतील कलाकारांचे आवाज हुबेहूब सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या या सादरीकरणाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप पाटील यांनी, तर आभार कराळे सर यांनी मानले.

# सातारा शहरात महिलेचा विनयभंग व मारहाण

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहरालगतच्या एका उपनगरात ३२ वर्षीय महिलेचा विनयभंग करून मारहाण केल्याची गंभीर घटना घडली आहे. सात जणांनी जबरदस्तीने घरात प्रवेश करून अश्लील शिवीगाळ, दमदाटी करत फिर्यादी महिलेला बेदम मारहाण केली.


दै.प्रीतिसंगम दि. २३.०१.२०२६

NAME CHANGS

MY OLD NAME WAS ONKAR VIKAS SALUNKHE AND MY NEW NAME IS OMKAR VIKAS SALUNKHE


# सोलापूर–पुणे महामार्गावर नवे ६ उड्डाणपूल!

## अपघात वाढल्याने सावळेश्वर ते वरवडे दरम्यान 'या' ठिकाणी होणार सर्व्हिस रोड

**सोलापूर/प्रतिनिधी:–**

सोलापूर–पुणे महामार्गावर नवे ६ उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत. या महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळे सावळेश्वर ते वरवडे दरम्यान 'या' ठिकाणी हे उड्डाण पूल होणार असून या ठिकाणी सर्व्हिस रोड देखील होणार आहे.

सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. अपघात कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने (एनएचएआय) ठोस उपाययोजना हाती घेतल्या आहेत. आता महामार्गावरील सावळेश्वर ते वरवडे टोल नाक्यापर्यंत सहा ठिकाणी नव्याने उड्डाणपूल उभारले जात आहेत. मोहोळ येथे यापूर्वीच उड्डाणपूल करण्यात आले आहे.

सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अपघात कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने (एनएचएआय) ठोस उपाययोजना हाती घेतल्या आहेत. आता महामार्गावरील सावळेश्वर ते वरवडे टोल नाक्यापर्यंत सहा ठिकाणी नव्याने उड्डाणपूल उभारले जात आहेत. मोहोळ येथे यापूर्वीच उड्डाणपूल करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात दरवर्षी रस्ते अपघातात सरासरी ७५० जणांचा मृत्यू होतो. सोलापूर–पुणे या राष्ट्रीय महामार्गावर सर्वाधिक अपघात झाले आहेत. सर्व्हिस रोड गावापासून दूर असल्याने वाहनचालक विरुद्ध दिशेने ये–जा करतात. वाहनांचा वेग देखील वाढला आहे. दुचाकी, चारचाकी, जड वाहनांची संख्या जास्त झाल्याने सर्व्हिस रोड अपुरा पडत असल्याचीही स्थिती आहे.

महामार्ग तयार करताना त्यावेळी वाहनांची वर्दळ आता आहे तेवढी नव्हती. अपघाताचे प्रमाणही नियंत्रणात होते. मात्र, आता वाहनांची संख्या वाढल्याने या महामार्गावर सर्व्हिस रोड व उड्डाणपुलांची आवश्यकता भासली. त्यामुळे एनएचएआयकडून आवश्यक त्या ठिकाणी उड्डाणपूल उभारले जात आहेत.



चिखली (ता. मोहोळ) येथील काम अंतिम टप्प्यात, यावली (ता. मोहोळ) काम पूर्ण होत असून दीड महिन्यात वाहतूक सुरू होईल. अर्जुनसोंड (ता. मोहोळ) येथील एका बाजूचा सर्व्हिस रोड पूर्ण, बाकीचे कामाला ११ महिने लागणार, शेटफळ (ता. मोहोळ) येथील उड्डाणपुलाचे काम सुरू, तीन महिन्यात काम पूर्ण होईल. सावळेश्वर (ता. मोहोळ) येथे उड्डाणपूल होणार असून एका वर्षात काम पूर्ण होईल. रांझणी (ता. माढा) प्राची हॉटेलजवळ उड्डाणपूल होणार असून त्याचा आराखडा तयार केला आहे.

सध्या काम सुरू असणाऱ्या पुलाच्या कामामुळे यावली, शेटफळ, चिखली या ठिकाणी सर्व्हिस रोडने वाहतूक वळवली आहे. मात्र पर्यायी केलेल्या या सर्व्हिस रोडचे काम निकृष्ट झाल्याने पूल सुरू होईपर्यंत वाहन चालकांना खड्ड्यातून कसरत करत वाहन चालवावे लागत आहे. अनेक ठिकाणी तर सर्व्हिस रोड देखील नाहीत.

> **अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना**
>
> सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणे (ब्लॅक स्पॉट), सतत अपघात होणारी ठिकाणांवर 'एनएचएआय'कडून सर्व्हिस रोडचा विस्तार, उड्डाणपूल उभारले जात आहेत. जेणेकरून स्थानिक नागरिकांसह वाहनधारकांची सोय व्हावी आणि अपघात कमी होतील, हा त्यामागील हेतू आहे.
>
> – स्वप्नील कासार,
> संचालक, राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण, सोलापूर


महावितरण

## वीज बंद निवेदन

म.रा.वि.वि.कंपनी विभागीय कार्यालय, कराड कडून कळविणेत येते की, खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे **दि.23.01.2026 रोजी** महापारेषणच्या 110 केव्ही टेंभू उपकेंद्रातील अत्यंत तातडीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी खाली नमूद केलेल्या गावांचा शेतीपंपाचा व 11 केव्ही टेंभू LIS वाहिनीचा विद्युत पुरवठा खालील कालावधीत खंडीत राहणार आहे.

| अ. क्र | दिनांक | उपकेंद्राचे/वाहिन्यांचे नांव | वीज पुरवठा खंडीत राहणाऱ्या गावांची नावे | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | दि. 23.01.2026 | 11 केव्ही टेंभू स्विचिंग उपकेंद्र, 11 केव्ही कॉलेज एजी वाहिनी, 11केव्ही टेंभू गावठाण वाहिनी, 11 केव्ही टेंभू LIS वाहिनी, 11केव्ही कार्वे गावठाण वाहिनी, 11केव्ही कार्वे एजी वाहिनी | कार्वे, कोडोली, कोरेगांव, टेंभू, सयापूर, गोवारे, वडगांव | दि. 23.01.2026 सकाळी 08.00 ते सायं.05.00 वाजेपर्यंत |

(टिप- काम नियोजित वेळेत पूर्ण न झाल्यास वीज पुरवठा खंडीत कालावधी वाढू शकतो तसेच काम वेळेआधी पूर्ण झाल्यास किंवा रद्द झाल्यास विदयुत प्रवाह निर्धारित कालावधीच्या आधी चालू करण्यात येईल)

PRO NO/BMTZ/178/2025-26

कार्यकारी अभियंता, कराड

# कराड तालुक्यात ३२३ अर्ज वैध;१३ अर्ज अवैध

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक;२७ जानेवारीपर्यंत अर्ज माघारी घेण्याची मुदत



**कराड/प्रतिनिधी:–**

कराड तालुक्यात होत असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची शासकीय छाननी गुरुवारी येथील बहुउद्देशीय सभागृहात अत्यंत शांततेत पार पडली. तालुक्यातील १२ जिल्हा परिषद गट व २४ पंचायत समिती गणांसाठी दाखल एकूण ३३६ उमेदवारी अर्जांपैकी ३२३ अर्ज वैध, तर १३ अर्ज अवैध ठरविण्यात आले आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेचे ४ आणि पंचायत समितीचे ९ अर्ज अवैध ठरले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली.

### अर्ज माघारीनंतर लढतींचे चित्र होणार स्पष्ट

अर्ज छाननीनंतर आता उमेदवारांना मंगळवार, २७ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची संधी देण्यात आली आहे.कोणत्या गटात व गणात किती उमेदवार माघार घेणार,यावरच प्रत्यक्ष निवडणूक लढतीचे चित्र स्पष्ट होणार असल्याने सर्व राजकीय पक्षांचे लक्ष माघार प्रक्रियेवर केंद्रित झाले आहे.

यामध्ये जिल्हा परिषद गटनिहाय छाननीचा अहवाल पुढीलप्रमाणे, उंब्रज जिल्हा परिषद गटात दाखल झालेल्या अर्जांपैकी पूर्वा संतोष बेडके आणि संजीवनी सुरेश देशमाने यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आले असून, उर्वरित सर्व अर्ज वैध ठरले. पाल जिल्हा परिषद गटात योगीराज जगन्नाथ सरकाळे यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला आहे. वारुंजी जिल्हा परिषद गटातून दाखल झालेल्या अर्जांमध्ये प्रशांत भीमराव थोरवडे यांचा अर्ज छाननीत अवैध ठरला, तर उर्वरित मसूर, कोपर्डे हवेली, सैदापूर, तांबवे, विंग, कार्वे, रेठरे बुद्रुक, काले व येळगाव या सर्व जिल्हा परिषद गटांतील उमेदवारी अर्ज छाननीत वैध ठरले आहेत.

### ..ते दोन अर्ज वैद्य

सैदापूर जिल्हा परिषद गटातील भाजप उमेदवार सागर शिवदास, तसेच सवादे पंचायत समिती गणातील संजय शेवाळे यांच्या उमेदवारीबाबतचा निर्णय छाननीवेळी प्रलंबित ठेवण्यात आला होता मात्र, तो रात्री उशिरा देण्यात आला असून त्यांचे अर्ज वैद्य ठरवण्यात आले आहेत.

तर पंचायत समिती गणनिहाय छाननीचा अहवाल पुढीलप्रमाणे, उंब्रज पंचायत समिती गणातून दादा निवृत्ती कांबळे यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला आहे. चरेगाव पंचायत समिती गणातून संजीवनी सुरेश देशमाने यांचा उमेदवारी अर्ज छाननीत अवैध ठरविण्यात आला. तांबवे पंचायत समिती गणातून सविता रामचंद्र ढवळे यांचा अर्ज अवैध ठरला आहे. तर कोळे पंचायत समिती गणातून निलेश दिनकर पवार यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आला.

तसेच सैदापूर पंचायत समिती गणात सर्वाधिक चार उमेदवारी अर्ज अवैध ठरले. त्यामध्ये ज्ञानेश्वरी राहुल जानराव, सुशांत गुणवंत कांबळे, अक्षय अरविंद तुपे आणि अशोक काकासो रामुगडे यांचा समावेश आहे. पाल पंचायत समिती गणातून अजिंक्य संजय माने यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला असून, उर्वरित तळबीड, वडोली भिकेश्वर, मसूर, वाघेरी, कोपर्डे हवेली, हजारमाची, वारुंजी, कोयना वसाहत, सुपने, विंग, गोळेश्वर, कार्वे, शेरे, रेठरे बुद्रुक, काले, कालवडे, सवादे व येळगाव या सर्व पंचायत समिती गणांतील उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत.

# मध्यरात्री आझाद चौकातील आटणी गाळणी दुकानाला भीषण आग;सुमारे तीन लाखांचे नुकसान

**कराड/प्रतिनिधी:–**

शहरातील आझाद चौक परिसरात बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास सोन्या-चांदीच्या आटणी गाळणी दुकानाला अचानक आग लागल्याने खळबळ उडाली. भट्टीतून लागलेल्या या आगीत दुकानातील साहित्य जळून खाक झाले असून, सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने नागरिकांचे प्रसंगावधान आणि अग्निशमन दलाच्या तात्काळ कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली.

याबाबतची माहिती अशी की, संतोष वसंत शिर्के यांचे आझाद चौक परिसरात सोन्या-चांदीच्या आटणी गाळणीचे दुकान आहे. बुधवारी रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास बंद असलेल्या दुकानातून अचानक धुराचे लोट बाहेर येऊ लागले. काही वेळातच आगीच्या ज्वाळा दिसू लागल्याने परिसरातील नागरिक सतर्क झाले.

या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते बरकत पटवेकर, ओमकार मूळे आणि अबरार मुजावर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी प्राथमिक स्वरूपात आग विझविण्याचा प्रयत्न करत कराड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. सूचना मिळताच अग्निशमन अधिकारी व कर्मचारी अग्निशमन वाहनासह काही मिनिटांतच घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन दल व नागरिकांनी संयुक्तपणे पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवले. वेळेत आग आटोक्यात आल्याने शेजारील दुकाने व परिसरातील वस्ती सुरक्षित राहिली. अन्यथा मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.



या आगीमध्ये दुकानातील भट्टी, यंत्रसामग्री व इतर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अंदाजे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली आहे. आगीचे नेमके कारण तपासले जात असून, पुढील तपास सुरू आहे.

# भाजपमधील निष्ठावंतांवर अन्याय,आयारामांना संधी

## ॲड.महादेव साळुंखे;निष्ठावंत कार्यकर्त्यांचे पाय छाटले धनुष्यबाणावरून उंब्रज गटातून लढणार निवडणूक

**कराड/प्रतिनिधी:–**

भारतीय जनता पक्षात गेली पंधरा वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सातत्याने डावलले जात असून, आयत्यावेळी पक्षात प्रवेश केलेल्यांना उमेदवारी दिली जात असल्याने भाजपमधील जुने कार्यकर्ते प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. या अन्यायकारक धोरणांविरोधात उंब्रज जिल्हा परिषद गटातील इच्छुक उमेदवार ड. महादेव साळुंखे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.



कराड येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. साळुंखे यांनी, भाजपच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेवर थेट प्रश्न उपस्थित केले. उत्तर कराड विधानसभा मतदारसंघातील पक्षीय नेतृत्वाकडून उमेदवारी नाकारण्यात आल्यामुळे आपण नाईलाजाने शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावरून उंब्रज जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी केली. यावेळी तळबीड गणातील शिवसेनेचे उमेदवार दिनेश घाडगे, सुशांत इनामदार, शिवाजी भोसले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

ॲड. साळुंखे म्हणाले, २०१० पासून मी भाजपसाठी सातत्याने काम करत आहे. २०१२ साली जिल्हा परिषद निवडणूक लढवली असून, त्यावेळी १,४७१ मते मिळाली होती. प्रतिकूल परिस्थितीतही पक्ष सोडला नाही. उंब्रज येथे तालुक्यातील भाजपचे पहिले कार्यालय सुरू केले. विरोधी सरकारच्या काळात अडीच वर्षे रस्त्यावर उतरून आंदोलनं केली. मात्र आज जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांनाच तिकीट नाकारले जात आहे, ही बाब अत्यंत वेदनादायक आहे.

ते म्हणाले, कराड उत्तरमध्ये भाजप पक्षवाढीसाठी रामकृष्ण वेताळ, दीपाली खोत, प्रमोद गायकवाड, नाना पिसाळ यांच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले. मात्र अशा धडाडीच्या कार्यकर्त्यांनाही यंदा डावलण्यात आले. आम्ही पद, सत्ता किंवा वैयक्तिक लाभासाठी काम केले नाही. केवळ पक्षचिन्ह आणि विचारधारेसाठी काम केले. पण जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आयारामांना संधी देत निष्ठावंत कार्यकर्त्यांचा बळी घेतला जात आहे.

भाजपमधील अंतर्गत लोकशाही संपुष्टात आल्याचा आरोप करताना ॲड. साळुंखे म्हणाले, पूर्वी उमेदवारी ठरवताना मंडलाध्यक्ष, तालुकाध्यक्षांचे मत महत्त्वाचे मानले जात होते. मात्र आता सर्व अधिकार स्थानिक आमदारांकडे केंद्रीत झाल्याने पक्षातील समन्वय व शिस्त ढासळली आहे. यंदा उंब्रज जिल्हा परिषद गटात खुले आरक्षण असताना ही संधी खऱ्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांना मिळायला हवी होती. मात्र तीही हिरावून घेतली गेली. आज सत्ता आहे म्हणून अवघ्या दोन महिन्यांपूर्वी काँग्रेस किंवा राष्ट्रवादीतून आलेल्यांना तिकीट दिले जात आहे. मग १२ ते १५ वर्षे पक्षासाठी काम करणाऱ्यांचे काय? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि मग स्वतः या तत्त्वावर मी आजवर काम केले आहे. अन्याय सहन करणे हा माझा स्वभाव नाही. त्यामुळे समविचारी पक्षात प्रवेश करून ही लढाई लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पष्ट करत ॲड. महादेव साळुंखे यांनी, उंब्रज जिल्हा परिषद गटातून शिवसेनेच्या (शिंदे गट) धनुष्यबाणावर निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पाचगणी नगरपालिकेत नेतृत्वाचा नवा अध्याय

## उपनगराध्यक्ष प्रकाश गोळे व स्वीकृत नगरसेवकांचा गौरव

**पाचगणी/प्रतिनिधी:–**

पाचगणी नगरपालिकेच्या राजकीय आणि प्रशासकीय इतिहासात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. नगरपालिकेच्या सभागृहात पार पडलेल्या विशेष बैठकीत उपनगराध्यक्ष तसेच स्वीकृत नगरसेवक पदावर नवनिर्वाचित मान्यवरांची अधिकृत घोषणा करण्यात आली. या घोषणेनंतर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट आणि अभिनंदनाच्या शुभेच्छांचा वर्षाव झाला.

पाचगणी नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी श्री. प्रकाश गोळे यांची बिनविरोध निवड झाल्याने संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरविकासासाठी सातत्याने कार्यरत राहणारे, प्रत्येक नागरिकाशी थेट संवाद साधणारे आणि प्रशासनावर प्रभावी पकड असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या निवडीमुळे नगरपालिकेच्या कामकाजात अधिक गतिमानता येईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

नगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक पदावर सौ. अनिता चोपडे आणि श्री. गणेश कासुर्डे यांची निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ स्वीकारताना त्यांच्या चेहऱ्यावर शहरसेवेचा अभिमान स्पष्ट दिसत होता. त्यांच्या अनुभव, कार्यशैली आणि सामाजिक बांधिलकीमुळे नगरपालिकेच्या विकासकार्याला नवी दिशा मिळेल, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

या सोहळ्यास नगरपालिकेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपस्थितांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव करत शहरविकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

नवनिर्वाचित नेतृत्वाने स्वच्छता, पर्यटनविकास, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत पाचगणी शहराला आदर्श नगरपालिकेचा दर्जा मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. पाचगणी नगरपालिकेतील या नव्या नेतृत्वामुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच नवी गती मिळणार आहे.

# खा.एस.डी. पाटील जयंतीनिमित्त ईश्वरपुरात विविध उपक्रम:ॲड.धैर्यशील पाटील

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.खा.एस.डी. पाटील यांची ११५ वी जयंती समारंभ व ३९ व्या आंतरराज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचा शुभारंभ ईश्वरपूर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे यांच्या हस्ते, आष्टा नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रा. विशाल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार आज दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता ईश्वरपूर येथे होत आहे, अशी माहिती संस्थेचे सहसचिव ॲड. धैर्यशील पाटील यांनी पत्रकार बैठकीत दिली.



ॲड. धैर्यशील पाटील म्हणाले, हा कार्यक्रम वाळवा तालुका शिक्षण संस्थेच्या प्रांगणात होणार आहे. या जयंती समारंभात संस्थेचे मानद सचिव ॲड.बी.एस. पाटील यांच्या मार्गदर्शन आणि प्रोत्साहनाने सुरू झालेल्या शब्द अंतर्यामी या त्रैमासिक विशेषाकांचा प्रकाशन सोहळा लोकनियुक्त नगराध्यक्ष विशाल शिदे यांच्या हस्ते होणार आहे.

### कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या तीन जणांविरोधात गुन्हा दाखल

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा तालुक्यातील साबळेवाडी फाट्यावर दि २० रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास बोलेरो पिकअप क्रमांक(एम. एच. १२ एफ.डी ५३३) मध्ये दोन बैले दाटीवाटीने भरून त्यांची वाहतूक करत असल्याची बजरंग दल आणि गोरक्षकांना माहिती मिळाली,गोरक्षकांनी याची कल्पना तालुका पोलिसांना दिली,


## विनम्र अभिवादन



खा.एस.डी.पाटीलसाहेब

राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील थोर नेते

**खासदार एस.डी.पाटीलसाहेब**

यांच्या ११५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्य विश्वस्त मंडळ व प्राचार्य,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

**वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे**

प्राचार्य,श्री.शिवाजी अद्यापक विद्यालय, इस्लामपूर,ता.वाळवा,जि.सांगली


# कराडमध्ये 'होमथॉन १.०'चा आज भव्य शुभारंभ

## नॅरडको कराडतर्फे प्रॉपर्टी व बिल्डिंग मटेरियल एक्स्पो;महिलांसाठी सन्मान व मेगा लकी ड्रॉचे आकर्षण

**कराड/प्रतिनिधी:–**

HOMETHON™-1.0

कराडच्या बांधकाम, रिअल इस्टेट व गृहनिर्माण क्षेत्राला नवी दिशा देणारा भव्य प्रॉपर्टी व बिल्डिंग मटेरियल एक्स्पो – 'होमथॉन १.०' नॅरडको कराड यांच्यावतीने आयोजित करण्यात आला असून, हा एक्स्पो दि. २३ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत बैल बाजार रोड, गणपती मंदिर शेजारी, मलकापूर (कराड) येथे होणार आहे. कराड व परिसरातील नागरिकांसाठी घरखरेदी, गुंतवणूक व आधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाची ही एक मोठी संधी ठरणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी ४ वाजता आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते होणार असून, पर्यटन व खनिकर्म मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी माजी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच कराड नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, मलकापूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष तेजस सोनवले व उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या एक्स्पोमध्ये घर, फ्लॅट, प्लॉट, निवासी व व्यावसायिक प्रकल्प, तसेच आधुनिक बांधकाम साहित्य, नवे तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पना यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. नागरिकांना थेट बांधकाम व्यावसायिक, विकासक व साहित्य उत्पादकांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असून, एक्स्पोदरम्यान घर किंवा बांधकाम साहित्य खरेदी करणाऱ्यांसाठी विशेष सवलती व आकर्षक ऑफर्स उपलब्ध असणार आहेत.

घराच्या उभारणीत महिलांचे मोलाचे योगदान लक्षात घेऊन या प्रदर्शनात महिलांसाठी विशेष सन्मान व मेगा लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रत्येक महिलेला विनामूल्य कूपन देण्यात येणार असून, त्यातून आकर्षक बक्षिसांची संधी मिळणार आहे. यामध्ये दहा महिलांना ओरिजिनल पैठणी साडी, तर प्रथम क्रमांकाच्या विजेत्या महिलेला पैठणीसह १ ग्रॅम सोन्याची नेकलेस देण्यात येणार आहे. हा मेगा लकी ड्रॉ दि. २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जाहीर होणार असून, कृष्णा उद्योग समूहाच्या प्रमुख आदरणीय सौ. उत्तरा भोसले (आईसाहेब) यांच्या हस्ते पार पडणार आहे.

'होमथॉन १.०' हा उपक्रम कराड व परिसरातील नागरिकांसाठी केवळ प्रदर्शन न राहता घरखरेदी, बांधकाम, गुंतवणूक आणि महिलांसाठी सन्मानाची एक अनोखी पर्वणी ठरणार असून, कराडच्या बांधकाम व रिअल इस्टेट क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास नॅरडको कराडचे संस्थापक अध्यक्ष अरविंद खबाले यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नॅरडको कराडचे उपाध्यक्ष सुभाष लोंढे हे विशेष प्रयत्नशील असून, सचिव संदीप शिंदे, खजिनदार अजित पाटील तसेच संचालक मंडळातील किशोरकुमार साळुंखे, पंकज बागल, प्रशांत मोहिते, विजय जगताप, मंगेश हिरवे, रविराज शिंदे, अजित साळुंखे, धनंजय येडगे, सौरभ तवटे, मच्छिंद्र कुंभार, विजय गायकवाड, विक्रम घारे, अनुराज थोरात, प्रवीण पाटील आदी मान्यवर प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी सक्रिय सहभाग घेत आहेत.

# प्रशासक काळात पारदर्शी कारभाराने १४ कोटींची बचत

## आयुक्तसत्यमगांधी:गतिमान,लोकाभिमुखकारभार:७५लोकसेवा ऑनलाईन

**सांगली/प्रतिनिधी:–**

महापालिकेने प्रशासक कालावधीत गेल्या दहा महिन्यात पालिकेचे कामकाज पारदर्शी, गतीमान व लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. पालिकेच्या विविध विभागामार्फत होणाऱ्या कामांची निवीदा प्रक्रिया अतिशय पारदर्शीपणे राबवली. यामुळे तब्बल १४ कोटीं रुपयांची बचत झाली असून या निधीतून अन्य विकासकामे करण्यात येत आहेत, पालिकेच्या वतीने नागरिकांना देण्यात येणाऱ्या ५७ लोकसेवा ऑनलाईन करण्यात आल्या. अनेक वर्षे रखडलेली सांगली, मिरज ड्रेनेज योजना मार्च पूर्वी तर कुपवाड ड्रेनेज योजना पावसाळ्यापूर्वी कार्यान्वित होणार आहे. दुसऱ्या टप्यातील अतिक्रमण हटाव मोहिमही लवकरच सुरु करणार असल्याचे आयुक्त सत्यम गांधी यांनी पत्रकार बैठकीत सांगितले.



आयुक्त सत्यम गांधी यांनी १६ एप्रिल २०२५ रोजी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासकपदाचा कार्यभार घेतला, महापालिकेत लवकरच नव पदाधिकारी येणार असल्याने आयुक्तांनी त्यांच्या कामकाजाचा लेखाजोखा मांडला. प्रशासक काळात घेतलेले धोरणात्मक निर्णय, निर्णयप्रक्रियेतील नियमबद्धता, ई गव्हर्नन्सचा वापर, फाईल ट्रॅकिंग, बेटबद्ध निर्णय व नागरिकाभिमुख कार्यपद्धती यांचा सर्व विभागांत एकसंघ अंमल करण्यात आल्याचे सांगून आयुक्त गांधी म्हणले, नगरोत्थान, दलितेत्तर वस्ती विकास योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या कामाच्या निविदा पारदर्शक राबविल्या, रस्ते, गटारी, बगीचा सुधारणा, खुले भूखंड सुधारणा कामांच्या निविदामध्ये स्पर्धा झाली. निविदा कमी दराने आल्या, यामुळे महापालिकेचे १२.३० कोटी रुपये वाचले, दुसऱ्या कामात १.५१ कोटी रुपयांची बचत झाली. एकूण १३.८८ कोटी रुपये वाचवले आहेत. या निधीतून अन्य विकासकामे झाली आहेत. सांगलीतील काळीखण येथे लेझर शो, संगीतावर आधारित कारंजे, विद्युत रोषणाई हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. मिरजेतील भारतनगर येथेही ६.६८ कोटी रुपये खर्चुन असाच प्रकल्प राबविण्यात येत आहे. वारणाली मल्टीटीस्पेशालिटी हॉस्पिटल लवकरच रुग्णसेवेत दाखल होईल. पूरनियंत्रण व साचून राहणा पाण्याचा निचरा करण्यासाठी ६०० कोटींच्या कामांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

आयुक्त गांधी म्हणाले, महापालिकेच्या ६३ पैकी ५७ सेवा ऑनलाईन झाल्या आहेत. महापालिकेच्या इतिहासात सर्वाधिक २०७ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली. लाह-समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या ६२ वारसांना महापालिका सेवेत सामावून घेतले आहे. महापालिकेच्या ५१ शाळांमध्ये ५८५८ विद्यार्थी आहेत. शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मिशन निपुन हा उपक्रम सुरू आहे.

अतिक्रमणविरोधी मोहीम पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. नोटिसा दिल्या असून काही ठिकाणची अतिक्रमणे लवकरच काढली जाणार आहेत.

कुपवाड ड्रेनेज योजनेसाठी ५० कोटींचा प्रस्ताव

आयुक्त सत्यम गांधी म्हणाले, महापालिकेने सुरु केलेले कुपवाड ड्रेनेज योजनेचे काम अतिशय गतीने सुरु आहे, यात सांगली महापालिका राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. ७० टक्के काम पूर्ण झाले असून ठेकेदाराला १०० कोटी रुपये दिलेले आहेत. ही योजना पावसाळ्यापूर्वी कार्यान्वित होईल. सांगली ड्रेनेज योजनेचे काम २० दिवसात पूर्ण होईल. मिरज ड्रेनेज योजनेचे ९६ टक्के काम पूर्ण झाले असून मार्चअखेर या योजनेचे सर्व काम पूर्ण होईल, कुपवाड ड्रेनेज योजनेंतर्गत हाऊस चेंबरसाठी ५० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे.

